प्रकरण १ ले

# मराठी कथा वाङ्मय आणि विज्ञान कथा

प्रकरण १ ले

# मराठी कथा वाङ्मय आणि विज्ञान कथा

## १. मराठी वाङ्मयातील कथेचा प्रवास :-

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्रे, आत्मचरित्रे अशा विविध प्रवाहांचा समावेश होतो. मराठी साहित्यातील कथा हा एक महत्त्वपूर्ण वाङ्मय प्रकार असून कथा वाङ्मयाचे मूळ लोककथेत सापडते. प्राचीन वाङ्मयात कथेची विविध रूपे दिसून येतात. मराठीतील कथा रचनेचा आरंभ तंजावर येथील सर्फोजी राजे या पंडिताकरवी इ.स. १८०६ साली 'बाळबोध मुक्तावली' या इसापनीतीच्या भाषांतराने झाला.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील कथा वाङ्मयाचा विकास सामान्यत: मासिकांच्या माध्यमातून झाला आहे. त्याचप्रमाणे मराठीतील कथा लेखनास प्रेरणा देण्याचे व त्या कथा वाचकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य मासिकांनी केले आहे. त्यानुसार कथा वाङ्मयाचे कालखंड पडले आहेत ते पुढीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अव्वल इंग्रजी कालखंड | - | १८०० ते १८८५ |
| २. | करमणूक कालखंड | - | १८८६ ते १९१५ |
| ३. | मनोरंजन कालखंड | - | १९१६ ते १९२५ |
| ४. | यशवंत किर्लोस्कर कालखंड | - | १९२६ ते १९४५ |
| ५. | सत्यकथा अभिरूची कालखंड | - | १९४५ ते १९६० |
| ६. | आजची कथा | - | १९६० नंतर |

प्रारंभापासून आतापर्यंत मराठी कथेने वेगवेगळी वळणे घेतलेली दिसतात. ह. ना. आपटे, वि.सी.गुजर यांच्यानंतर ना.सी.फडके, वि.स.खांडेकर या प्रतिभावंत कथाकारांनी मराठी कथेला आकर्षक रूप दिले. दिवाकर कृष्ण, य.गो.जोशी, द.र.कवठेकर, ज्योत्स्ना देवधर यांनी कौटुंबिक, दया पवार, बाबूराव बागुल यांनी दलित, तर ग.ल.ठोकळ, शंकर पाटील, द.व्यं.माडगुळकर, द.मा.मिरासदार इ. यांनी ग्रामीण जीवनाचा कथेतून वेध घेतला. १९६० नंतरच्या कालखंडात दलित कथा, आदिवासी कथा, विज्ञान कथा इ. नवे प्रवाह निर्माण झाले. जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, बाळ फोंडके या विज्ञानकथाकारांनी विज्ञान कथा लिहिल्या.

'विज्ञानकथा' हा कथासाहित्य प्रकाराचा एक उपप्रकार आहे. 'विज्ञानसाहित्य' ही संज्ञा बरीचशी ढोबळ आणि सर्वसमावेशक आहे. या साहित्य प्रकारात विज्ञानाशी संबंधित सर्वच उदा. विज्ञानविषयक लेख, निबंध, ललित विज्ञानसाहित्य वगैरेही समाविष्ट होतात.

अर्वाचीन काळातील मराठी साहित्याचे अवलोकन केले तर मराठी साहित्य विविधतेने आणि विपुलतेने संपन्न होत आल्याचे दिसून येते. आशय आणि अभिव्यक्ती या उभयविध दृष्टीने अनेक वळणे मराठी साहित्याने आत्मसात केली आहेत. मराठीत अनेक वाङ्मय प्रकार निर्माण झाले. त्यातील 'विज्ञानसाहित्य' हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. विज्ञान साहित्यातही 'विज्ञानकथा' भरपूर प्रमाणात लिहिल्या गेल्या. विज्ञानकथाकारात प्रामुख्याने जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, बाळ फोंडके, अनंत सामंत, माधुरी शानभाग, सुबोध जावडेकर, अरुण मांडे, अरूण साधू, यशवंत रांजणकर या साहित्यिकांनी विज्ञान कथा दालन समृध्द केले.

प्रस्तुत प्रबंधामध्ये बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथेचा विचार एकूणच मराठीतील विज्ञान कथेच्या संदर्भात करावयाचा आहे. विज्ञानकथेचा विचार करताना यापूर्वीच्या मराठी कथेचा विचार करणे अपरिहार्य ठरते. हरिभाऊ आपटे यांच्या कथेपासून नवकथेपर्यंत मराठी कथेचा स्थूल विचार प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे. हे करीत असताना विज्ञान कथेच्या काही पाऊलखुणा या विकासक्रमात आढळतात का ? याचाही विचार प्रस्तुत प्रकरणात करता येईल.

**१. अव्वल इंग्रजी कालखंड :-**

इंग्रजांच्या आगमनानंतर आपल्याकडील लोकांना छपाईची कला अवगत झाली व छापखाने निघाले. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने नव्या युगाचा प्रारंभ झाला. संस्कृत व इंग्रजी कथांची भाषांतरे होऊ लागली आणि 'भाषांतर युग' निर्माण झाले.

१८०६ मध्ये तंजावरचे सर्फोजी राजे यांनी बालबोध मुक्तावली प्रसिद्ध केली. त्यानंतर डॉ. कॅरी यांनी वैजनाथ पंडिताकडून 'सिंहासन बत्तीशी' (१८१४), 'हितोपदेश' (१८१५) ही भाषांतरे करवून घेतली. १८२२ मध्ये 'पंचोपाख्यान', 'पंचतंत्र' यांचे भाषांतर प्रसिद्ध झाले. रघुनाथ पंडिताने 'गोष्ट शतक' लिहिले. स. का. छत्रे यांनी 'बालमित्र भाग १ व २' व 'वेताळपंचवीशी' लिहिले.

बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३१ मध्ये 'नितीकथा' लिहिले. सुरूवातीच्या काळात ही पुस्तके लिहिली गेली. १९२० मध्ये 'बॉम्बे ट्रस्ट' आणि 'बुक सोसायटी संस्था' ही निर्माण झाली.

या संस्थेने धर्मप्रसारासाठी विपुल प्रमाणात ख्रिस्ती वाङ्‌मय निर्माण केले. उदा.मिसेस कॅन्डी, मिसेस फेरार यांनी पुस्तके लिहिली.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' लिहिल्या. याच काळात 'बकासुराची बखर', 'चंद्रहास्य बखर', 'नलराजाची बखर' इ. बखरकथाही लिहिल्या गेल्या. शेक्सपिअरच्या आणि लॅमच्या नाट्य कथांवरूनही काही कथा अनुवादित करण्यात आल्या.

मराठी कथा ग्रंथाबरोबरच नियतकालिकातूनही लिहिली जाऊ लागली. या काळात 'दिग्दर्शक' (१८४०), 'ज्ञानोदय' (१८४२), 'विविध ज्ञानविस्तार' (१८६७) ही प्रमुख नियतकालिके होती. ज्ञानोदय हे विशेषत: ख्रिस्ती धर्मप्रसार करणारे मासिक होते. या कालखंडातील कथा अनुवादित होत्या. तसेच त्या सामान्य व बाळबोध होत्या, व त्यांना स्वत:ची शैली, डौल नव्हता. अद्‌भुतरम्य व कल्पनारम्य असे कथांचे स्वरूप होते व बोध करणे या हेतूने कथा लिहिलेल्या दिसतात. मिशनरी प्रसारासाठी काही कथा प्रसिद्‌ध झाल्या, राजाश्रय किंवा मिशनऱ्यांच्या मदतीने ग्रंथ प्रसिद्‌ध झाले.लोकांना कथेची गोडी लावण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक समस्या, मानवी मनाचा वेध त्यापासून या कथा दूर होत्या. अर्थात असे असूनही या कालखंडात कथा वाङ्‌मयाची सुरूवात झाली. लोकांना कथा आवडू लागल्या. अन्‌ त्यामुळेच पुढील कालखंडात या कथा विकसित झाल्या.

**२. करमणूक कालखंड :-**

खरी मराठी कथा १८८० पासून म्हणजे 'करमणूक' च्या जन्मापासून सुरू झाली असे मानले जाते. त्यापूर्वी कथा लिहिल्या गेल्या, पण त्यांचे स्वरूप बहुतांशी भाषांतरित, अनुकरणात्मक व अद्‌भुतरम्य असे होते. हरिभाऊ आपटे यांनी 'करमणूक' नावाचा अंक प्रसिद्‌ध केला. करमणूकचे प्रमुख आकर्षण होते, हरिभाऊंच्या 'आजकालच्या गोष्टी' आणि 'स्फुट गोष्टी' होय. स्फुट गोष्टीच्या रूपाने 'करमणूक' ने आजच्या मराठी लघुकथेचा पाया घातला, म्हणून या कालखंडाला 'करमणूक कालखंड' म्हणतात. या काळातील कथा अद्‌भुततेच्या सृष्टीतून वास्तवाकडे आल्याचे दिसून येते. हरिभाऊंचे कथादालन खूपच समृध्द आहे. उदा. 'काळ तर मोठा कठीण आला' (दुष्काळावर आधारित कथा), 'थोड्या चुकीचा घोर परिणाम' (दारुचे व्यसन), 'कसे दिवस गेले' (प्लेग काळातील परिस्थितीचे वर्णन) अशा कथा त्यांनी लिहिल्या. त्याचप्रमाणे 'शाब्बास रामभाऊ', 'सरस्वतीचा संसार', 'उपकार फळास आला' इ. अनेक दर्जेदार कथा त्यांनी प्रसिद्‌ध केल्या.

अशारीतीने आधुनिक मराठी कथेचा प्रारंभ हा हरिभाऊ आपटे यांच्या कथेपासून झाला. या काळात बोधवाङ्मयावर भर होता. मराठी कथेचे आद्यप्रवर्तक म्हणून हरिभाऊ आपटेंचा उल्लेख करावा लागतो. मध्यमवर्गीय जीवनाचे वास्तव परिणामकारक चित्रण त्यांनी केले. त्यांच्यावर आगरकर, रानडे यांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो.

तात्पर्य, करमणुकीमुळे मराठी कथेमध्ये नेमकेपणा आला. ही कथा विविध विषयांना स्पर्श करु लागली अन् त्यामुळेच पुढे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून त्यांची नोंद घेतली गेली.

**३. मनोरंजन कालखंड :-**

'करमणुक' नंतर कथेच्या क्षेत्रात 'मनोरंजन' नियतकालिकाने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केलेली दिसते. १८८५ मध्ये विश्वनाथ रघुनाथ मित्र यांनी 'मनोरंजन' चा पहिला अंक काढला. मासिकाच्या मुखपृष्ठावर 'यत्र नार्यस्तु पुज्यस्ते रमन्ते तत्र देवत:' हे बोध वाक्य होते. मराठीत दिवाळी अंक काढण्याची प्रथा ही सर्वप्रथम मनोरंजनने सुरू केली. १९१० ते १९२५ या कालखंडात 'मनोरंजन' ने अनेक कसदार कथा प्रसिद्ध केल्या. मराठी कथेला वेगळे वळण देणारे वि.सी.गुजर व दिवाकर कृष्ण यांच्या कथा याच मासिकातून प्रसिद्ध झाल्या. वि.सी.गुजर यांनी सर्वाधिक ६०० पेक्षा जास्त कथा प्रसिद्ध केल्या म्हणून या कालखंडाला 'गुजर कालखंड' असे म्हटले जाते. त्यांच्या 'शेवटचे हास्य', 'पुरुषाची जात', 'बायकांची जात', 'गीतारहस्य' , 'द्राक्षांचा घोस', 'वन विहार', 'घातपात', 'जगदंबा' या कथा खूपच लोकप्रिय ठरल्या. प्रसन्न भाषाशैली, लालित्य व रचनाकौशल्य ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये होत.

याच काळात सहकारी कृष्ण या टोपण नावाने कथा लेखन करणारे कृष्णाजी अनंत एकबोटे यांच्या कथेचा मुख्य उद्देश समाजाला बोध करण्याचा होता. त्यांनी 'माझी कहाणी', 'कजाग सासू', 'संसार की नरकवास', 'संकट की सौभाग्य' इ. अशा कथा लिहिल्या. तर काशिबाई कानिटकर, सौ.गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के यांनी सांसारिक समस्या कथेतून मांडल्या. तसेच विनोदी कथांचा पाया घालणारे कॅ.लिमये, गडकरी यांनी याच काळात लेखन केले.

**४. यशवंत किर्लोस्कर कालखंड :-**

१९२६ मध्ये 'रत्नाकर', १९२८ मध्ये 'यशवंत' व त्याच दरम्यान 'किर्लोस्कर','ज्योत्सना', 'समीक्षा', 'प्रतिभा', 'संजीवनी', अशी मासिके सुरु झाली. या सर्व नियतकालिकांनी मराठी लघुकथेच्या समृद्धीला मोठा हातभार लावला. या कालखंडाचा पूर्वाध

'रत्नाकर' व 'यशवंत' ने तर उत्तरार्ध 'किर्लोस्कर' मासिकाने गाजवला. म्हणून हा कालखंड 'यशवंत किर्लोस्कर कालखंड' या नावाने ओळखला जातो.या काळात कथेला जास्त लोकप्रियता मिळालेली दिसते.

करमणूक, मनोरंजन आणि यशवंत व किर्लोस्कर या दोन कालखंडातील दुवा जुळविण्याचे कार्य दिवाकर कृष्ण यांनी केले. त्यांचा 'समाधी व सहा गोष्टी' हा १९२७ मध्ये पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. तसेच 'अंगणातील पोपट', 'मृणालीचे लावण्य', 'संकष्टी चतुर्थी', 'समाधी' इ. त्यांच्या कथा खूपच लोकप्रिय झाल्या. दिवाकरांनी मराठी कथेला एक नवी दृष्टी दिली.

दिवाकर कृष्णांनी लघुकथेला वळण लावले. त्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घालून लघुकथेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य फडके व खांडेकरांनी केले. फडके यांनी १९२६ पासून कथालेखनाला प्रारंभ केला. त्यांच्या 'शांता', 'तुरूंगांतून सुटका', 'गुलामाचे राज्य', 'माणूस जगतो कशासाठी ?' या कथा खूप गाजल्या. वि.स.खांडेकर यांना लघुकथा सृष्टीचे अनभिषिक्त सम्राट म्हटले जाते. मराठी कथावाङ्मयात रूपक कथा प्रकार खांडेकरांनी सजविला. फडके हे कलावादी, तर खांडेकर हे जीवनवादी होते. खांडेकरांचे सर्वच लेखन ध्येयवादी असते. त्यांनी काही विनोदी प्रकाराच्या कथाही लिहिल्या उदा. 'कवि', 'शिंपी व राजकारण', 'कढीभात', 'सुपारीचे खांड' इ.

य.गो.जोशी व मराठी कथा यांचे अतूट नाते आहे. 'जिव्हाळ्याच्या पालखीत बसलेल्या कथा' असा त्यांच्या कथांचा उल्लेख केला जातो. उदा. 'सुपारी', 'शेवग्याच्या शेंगा', 'वहिनीच्या बांगड्या' इ. कथा त्यांनी लिहिल्या.चि.वि.जोशी यांनी विनोदी कथा लिहिल्या. शुद्ध विनोदाचे निर्माते म्हणून त्यांचा साहित्यक्षेत्रात उल्लेख केला जातो. त्यांनी 'वायफळाचा मळा', 'एरंडाचे गुऱ्हाळ', 'चिमणराव आणखी चिमणराव' इ. अनेक कथासंग्रह लिहिले.

याशिवाय या कालखंडात वामन चोरघडे,गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, यांनीही कथा लिहिल्या. तसेच या कालखंडातील कथेला बहर आणण्यामध्ये प्र.के.अत्रे, अनंत काणेकर, श्री.म.माटे, विभावरी शिरूरकर इ. अनेक लेखकांचा समावेश होतो. इंदुमती शेवडे यांनी पहिले ग्रामीण कथाकार असे वामन चोरघडे यांना म्हटले आहे. या कालखंडातच ग्रामीण कथेचा प्रवाह मराठी साहित्यात सुस्पष्ट झाला.

## ५. सत्यकथा/अभिरुची कालखंड :-

या कालखंडातील कथेची वाटचाल 'सत्यकथा' व 'अभिरुची' या दोन नियतकालिकांच्या माध्यमातून झाली म्हणून या कालखंडाला त्याच नावाने ओळखले जाते. या कालखंडात कथेचे स्वरूप घुटमळणारी कथा असे होते. या कालखंडातील 'आता रणसंग्रामात उतरलो' या कथेच्या स्वरूपात अमूलाग्र बदल घडून येण्याचे कारण म्हणजे १९३९ ते १९४५ या दरम्यान झालेले दुसरे महायुद्ध व त्यात झालेला प्रचंड मानवी संहार होय. उध्वस्त मन, उध्वस्त कुटुंब, समाज अन् राष्ट्र ही रुपे कथेत अवतरली. मराठी कथा बदलली अशा बदलामध्ये ज्यांचे योगदान मोठे आहे त्यात अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगुळकर, दि.बा. मोकाशी, द.मा.मिरासदार, जयवंत दळवी, शंकरराव खरात, व.पु.काळे, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे, सदानंद रेगे, मधु मंगेश कर्णिक, वामन चोरघडे इ. अनेक मान्यवरांचा समावेश होतो.

या कालखंडात मराठी कथा ही सर्वस्पर्शी झाली. अरविंद गोखल्यांनी महायुद्ध, बेकारी, ४२ वे आंदोलन, जातीय दंगे, फाळणी, महागाई इ. घटनावर कथा लिहून मानवी विकृतीवर भर दिला तर पु.भा.भावेनी आपल्या कथेतून उदात्त भावनांचे दर्शन घडविले आहे. त्याचप्रमाणे व.पु.काळे यांनी शहरी माणसांच्या समस्यांना वाचा फोडली आहे. शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील इ. लेखकांनी दुर्लक्षित असलेल्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. जयवंत दळवींनी कामप्रेरणांना महत्त्व दिले आहे. तर मिरासदारांनी विनोदाला जवळ केले आहे. याच कालखंडात ग्रामीण कथा, दलित कथा, विज्ञान कथा इ. अनेक पोटविभाग निर्माण झाले. मराठी कथेला समज आली व स्वप्नात रमलेल्या मराठी कथेला खऱ्या जगाचे वास्तव दर्शन घडले.

## ६. १९६० नंतरच्या कथा :-

प्रामुख्याने १९६० नंतर कथेचे रूप पूर्णपणे बदलेले दिसते. विविध अंगानी कथा समृद्ध झाली. मराठीत दलित, ग्रामीण, प्रादेशिक, मनोविश्लेषणात्मक, विज्ञान, साहस असे प्रकार कथाविश्वात स्वीकारले गेले. ह.मो.मराठे, जयवंत दळवी, चि.त्र्य. खानोलकर, चंद्रकांत खोत इ. लेखकांनी मनोविश्लेषणावर भर दिला. कथेची भाषा, रचना, शैली या बाबतीत पूर्वीचे सारे संकेत झुगारून दिले. मराठी कथेने या कालखंडात प्रादेशिकतेचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला. मधु मंगेश कर्णिक, श्री.ना.पेंडसे यांनी कोकणचे दर्शन कथेतून घडविले.दलित साहित्यातील उद्रेक व्यक्त

करण्यासाठी भडक भाषा वापरली जाऊ लागली.

शृंगाराच्या नावाखाली कामुक व बीभत्स वर्णने कथेतून झाली. १९६० नंतर ग्रामीण, दलित, विज्ञान कथा जास्त लोकप्रिय होऊ लागल्या. मराठी साहित्यात त्यांचा वेगळेपणा दिसून येतो. यातील विज्ञानकथांचा आढावा आपण प्रस्तुत प्रबंधात घेतलेला आहे.

- **लघुकथांची वैशिष्ट्ये :-**

१) मराठी कथेच्या १८०० ते १९९० या प्रदीर्घ कालखंडाकडे नजर टाकल्यास दर १५/२० वर्षांनी त्यात बदल झाल्याचे दिसून येते. एकूणच तिची वाटचाल स्थुलाकडून सुक्ष्माकडे, घटनाप्रसंग चित्रणाकडून व्यक्तिचित्रणाकडे, चमत्कृतीकडून स्वाभाविकतेकडे सतत चालू आहे.

२) लघुकथेचे एकूण क्षेत्र वाढत चालले आहे. प्रारंभी ती मध्यमवर्गांचे जीवन रंगवित होती. त्यानंतर ती खेडूत दलित उपेक्षितांचे जीवन रंगवू लागली. आजच्या लघुकथेला कोणताही विषय वर्ज्य नाही.

३) आजची लघुकथा मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. व्यक्तीच्या प्रकट व अप्रकट मनात जे गुंतागुंतीचे व्यापार चालतात त्याचे चित्रण केले जात आहे.

४) आजच्या लघुकथेतून अधिकाधिक समाज दर्शन घडविण्याचा प्रयत्न होत आहे, असे दर्शन वास्तवाच्या पातळीवरून घडविले जात आहे.

५) मानवी जीवनातील विकृती, वर्तनातील विसंगती यावरही कथा लिहिल्या जात आहेत असे दिसते. अर्थात जे जसे आहे तसे ते लिहावे हा विचार रुढ होताना दिसत आहे.

६) अलिकडच्या कथांमध्ये शृंगाराच्या नावाखाली कामुक व बीभत्स वर्णने केली जात आहेत. परंतु तो मुख्यप्रवाह आहे असे म्हणता येत नाही, ती एक साहित्यिक वृत्ती आहे,तसाच एक वाचकवर्ग असतो असेही आढळते. आजची नवकथा जीवनमुल्यांपासून दुरावत चालली आहे.

७) आजच्या नवकथेत काही वेळा ध्येयनिष्ठा, मुल्यनिष्ठा, जीवननिष्ठा, साहित्यनिष्ठा दिसून येत नाही. नवनवे शोध, पापपुण्य, देवधर्म इ. भाबड्या कल्पनांना झटकून मानव विज्ञाननिष्ठ बनला. परंतु स्पर्धा, स्वार्थ, भौतिक सुखाची आसक्ती यामुळे त्यास जीवनमुल्यांविषयी काहीही वाटेनासे झाले आहे. त्याचेच प्रतिबिंब साहित्यात दिसू लागत आहे. कथेचा

विकास कसा झाला, तिचे रूप कसे बदलत गेले याचा आढावा येथे घेतला आहे. परिकथा, दैवतकथा, प्राणीकथा, पशुकथा, राक्षस कथा यापासून सुरू झालेली कथेची नौका अनेक अडथळे पार करीत नवकथेपर्यंत पोहचलेली दिसते.

तात्पर्य, अद्‌भुतरम्य कथेपासून प्रारंभ झालेली कथा लवकरच सामाजिक वास्तवदर्शी कथेपर्यंत पोहचली. नागरीजीवन चित्रित करता करता ती ग्रामीण चित्रणाकडे वळली. स्वातंत्र्यपूर्व काळातच तिचा विकास ग्रामीण - प्रादेशिकतेपर्यंत पोहचला.

स्वातंत्र्योत्तर काळात नवविचारांचा प्रभाव, कुळकायदा, शिक्षणप्रसार, औद्योगिकीकरण, दुसऱ्या महायुध्दाचा परिणाम, लोकशाहीतील पंचवार्षिक योजना व निवडणूका इ. जागतिक, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक घडामोडींचा जो समग्र समाजावर परिणाम होत होता व संपूर्ण समाजाचेच परिवर्तन होत होते त्याचा परिणाम साहित्य स्वरूपावर झाल्यास नवल नाही. डॉ.आंबेडकरांनी आपल्या दलित समाजास बरोबर घेऊन धर्मांतर केले. त्याचबरोबर शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा संदेश दिला आणि ती प्रेरणा घेऊन सुशिक्षित झालेल्या पहिल्या फळीतील अनेक लेखकांनी आपल्या साहित्याचा 'दलितसाहित्य' म्हणून एक वेगळा सशक्त प्रवाह निर्माण केला. याच काळात जागतिक पातळीवर विज्ञानप्रगती एवढी झेपावली की, साहित्यात विज्ञान साहित्याचा प्रवाह स्वतंत्रपणे आणि जोमदार असा वाढू लागला !

तसेंच आधुनिक मराठी कथेची सुरूवात भाषांतरित स्वरूपातून स्वतंत्र, अद्‌भुत, ऐतिहासिक, सामाजिक, कौटुंबिक, दलित , ग्रामीण या क्रमाने विकसित होऊन वास्तवाशी जवळीक साधू लागली. नवकथेने तर आशय आणि आविष्काराच्या बाजूनी फार मोठी झेप घेतली. त्यानंतर दलित साहित्याच्या प्रवाहात तर कथा अंतर्बाहय वास्तव होऊन अवतरली. हे कथेचे वास्तवास भिडणे विज्ञानकथेला पार्श्वभूमीच देऊन गेले असे दिसते.

## २. विज्ञान कथेचा प्रारंभ :-

### ● पाश्चात्य विज्ञानकथेचा प्रारंभ :-

**प्रास्ताविक :-**

विज्ञान क्षेत्राचा केंद्रबिंदू पाश्चात्यदेश मानला जातो. कारण यांत्रिक - तांत्रिक अनेक शोध पाश्चात्य देशात पाश्चात्य शास्त्रज्ञांनी लावले. स्वाभाविकच विज्ञानाचे साहित्यात प्रतिबिंब पडले ते प्रारंभी पाश्चात्य साहित्यातच ! म्हणून विज्ञानकथेचे मूळ पाश्चात्य साहित्यातच सापडते.

'सायन्स फिक्शन' ह्या संज्ञेचा मराठी पर्याय म्हणून 'विज्ञानकथा' ही संज्ञा रूढ झालेली दिसते. इंग्रजी साहित्यातील विज्ञानकथाविश्व कल्पक विविधतेने नटलेले आहे. इंग्रजीत विज्ञानकथा अनेक वर्षांपासून लिहिल्या जात आहेत. अनेक वर्षांपासून विज्ञानकथा लिहिल्या जात असल्या तरी त्याचे स्वरूप मुख्यत्वे करून 'चित्तचक्षू चमत्कारिक' अशा प्रकारचे होते. इंग्रजीत पहिली शास्त्रशुद्ध विज्ञानकथा १८१८ यावर्षी 'मेरी शेली' या लेखिकेने 'फ्रँकेनूस्टाइन' या नावाने लिहिली असे मानले जाते. या कथेत प्रथमच शास्त्रीय प्रयोग आणि वैज्ञानिक तत्त्व वापरून कथानक लिहिण्याचा प्रयत्न झाला.

इ.स. १८१८ पासून सुरू झालेली इंग्रजी विज्ञानकथा सुरूवातीला अगदी तुरळक प्रमाणात लिहिली गेली. ज्युल्स व्हर्न (१८२८ ते १९०५) हा फ्रान्समध्ये जन्मलेला लेखक पहिला व्यावसायिक विज्ञानकथाकार मानला जातो. अफाट कल्पनाशक्तीच्या जोरावर त्याने अनेक विज्ञानकथा लिहिल्या. ज्युल्स व्हर्नच्या कथानकांमध्ये आढळणाऱ्या अनेक वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्षात आल्यामुळे त्यांच्या कथांना 'खरी होणारी स्वप्ने' असे म्हटले जाते. विज्ञानकथांचे समीक्षक ज्यूल्स व्हर्न यांना विज्ञानकथांचा खरा जनक मानतात. आज वास्तवात दिसणाऱ्या अनेक वैज्ञानिक संकल्पना केवळ कल्पनाशक्तीच्या जोरावर ज्यूल्स व्हर्नने आपल्या कथानकांमध्ये मांडलेल्या दिसतात.

इंग्रजी विज्ञानकथेच्या क्षेत्रात जे अग्रगण्य लेखक होऊन गेले, त्यात एच.जी.वेल्स या विलक्षण कल्पनाशक्ती असलेल्या लेखकाची गणना होते. एक थोर विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार, कथालेखक आणि कादंबरीकार अशा विविध भूमिका त्यांनी आपल्या साहित्यातून पार पाडल्या. वेल्सची कल्पनाशक्ती विलक्षण होती. त्यांच्या कथांना भरपूर लोकप्रियता मिळाली. 'चंद्रावरील प्रवास', 'अदृश्य माणूस', 'मंगळवासीयांचे आक्रमण' यासारखे विविध विषय वेल्सने हाताळले. प्रसिद्ध विज्ञान कथाकार आयझॅक असिमोव्ह लिहितो, विज्ञानाच्या भवितव्याबद्दल ज्यूल्स व्हर्नचा दृष्टिकोन मर्यादित होता. याउलट एच.जी.वेल्सची कल्पनाशक्ती विलक्षण आणि स्वैर संचारी होती.

आय.ओ.ईव्हान्स या इंग्रजी विज्ञानकथेच्या समीक्षकाच्या मते, "इंग्रजी विज्ञानकथेचा विकास आणि विस्तार मुख्यत्वे एडगर ॲलन पो, ज्यूल्स व्हर्न आणि एच.जी. वेल्स या तीन लेखकांमुळे झाला."[१] ज्यूल्स व्हर्न आणि एच.जी. वेल्स या आद्य विज्ञानकथाकारांबरोबर अन्य लेखकांनीही विज्ञानकथा लिहिल्या. १९२० ते १९३० या कालावधीत विज्ञानकथा लिहिलेल्या

मासिकांची लाट आली आणि विज्ञानकथांच्या प्रकाशनात नियमितता आली. विज्ञानकथांची मागणी वाढली आणि मागणी तसा पुरवठा या न्यायाने विज्ञानकथा लिहिली जाऊ लागली.

विज्ञानाला अधिष्ठानी ठेवून जाणीवपूर्वक विज्ञानकथा विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात लिहिली गेली. १९२६ मध्ये हयूगो गर्नझ्बॅक ह्या अमेरिकन संशोधकाने 'अमेझिंग स्टोरीज' नावाचे एक मासिक काढून प्राप्त विज्ञानावर आधारलेल्या कथा प्रसिद्ध केल्या. विज्ञानकथेला त्याने 'सायंटिफिक्शन' असे नावही दिले. एक स्वतंत्र लेखनप्रकार म्हणून विज्ञानकथेला निश्चित स्थान देण्याचे बरेचसे श्रेय त्याला दिले जाते. गर्नझ्बॅकच्या नावाने दरवर्षी उत्कृष्ठ विज्ञानकथेसाठी 'हयुगो अवॉर्ड' दिले जातात. विज्ञानकथेचे वेगळेपण दाखवून देण्याचा पहिला प्रयत्न करणाऱ्या गॅर्नझ्बॅकने विज्ञानकथा कशी असली पाहिजे ह्या विषयी आपले विचार मांडलेले दिसतात. या काळात प्रसिद्ध झालेल्या कथांचे स्वरूप प्रामुख्याने साहसकथांचे होते.

गर्नझ्बॅकनंतर अमेरिकन विज्ञानकथाकार जॉन कॅम्पबेल हयाने विज्ञानकथेसंबंधी आपली भूमिका मांडलेली दिसून येते. त्यांच्या मते विज्ञानकथा हे प्रत्यक्ष विज्ञानाशीच निकटचे नाते असलेले एक माध्यम आहे. विज्ञानकथेसाठी आज जी सायन्स फिक्शन ही संज्ञा वापरतात ती कॅम्पबेलने रूढ केलेली दिसते. १९३७ साली त्याने 'अस्टाउंडिंग स्टोरीज' ह्या मासिकाच्या संपादनास आरंभ केला. या मासिकाचे नाव पुढे 'अस्टाउंडिंग सायन्स फिक्शन' असे ठेवण्यात आले. त्यानंतर शेवटी या मासिकाचे नाव 'अनॅलॉग सायन्स फॅक्ट अॅन्ड फिक्शन' असे ठेवण्यात आले.

जॉन कॅम्पबेल यांनी संपादक म्हणून विज्ञानकथेच्या संदर्भात महत्त्वाची कामगिरी बजावल्याचे दिसते. अनेक कल्पना सुचवून त्यांनी विविध लेखकांना लिहिते केले. त्यांच्या काळात इंग्रजी विज्ञानकथा फुलली म्हणून कॅम्पबेल युगाची सुरूवात हा इंग्रजी विज्ञानकथेत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कॅम्पबेलच्या प्रयत्नांमुळे ज्या विज्ञानकथाकारांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला त्यामध्ये आयझॅक असिमॉव्ह, थीओडोर स्टर्जन, रॉबर्ट हाइनलाइन, ए. ई. व्हान व्हॉग्ट, क्लीव्ह कार्टमिल, आर्थर सी.क्लार्क अशा लेखकांचा समावेश होतो.

विख्यात अमेरिकन साहित्यिक मार्क ट्वेन आणि नथॅन्थल हॉथॉर्न यांनीही विज्ञानकथेचे पूर्वसूरी वाटेल असे कथालेखन केलेले आहे. तसेच विज्ञानकथेच्या प्रभावातून ऑल्ड्स हक्सली, सी.एस. लेविस आणि कुर्ट व्हॉनेगुट ह्यांच्यासारख्या साहित्यिकांनिही विज्ञानकथा लिहिल्या व त्यामुळे विज्ञानकथेला एक वेगळी प्रतिष्ठाही मिळाल्याचे दिसते. अशारीतीने विज्ञानकथेचा प्रारंभ

आणि त्यात मोलाचे योगदान ज्या विज्ञानकथाकारांनी दिले त्यांचा परिचय आपण या भागात घेतलेला आहे.

- **मराठी विज्ञानकथेचा प्रारंभ :-**

'विज्ञानकथा' या वाङ्मय प्रकाराने आता मराठीत चांगलेच मूळ धरलेले दिसते. मराठी विज्ञानकथा दर्जेदार प्रतिष्ठित नियतकालिकांमधून आर्वजून प्रसिद्धी मिळवत आहेत आणि वाचकांकडूनही प्रतिसाद मिळत आहे. अशा या लोकप्रिय होत चाललेल्या वाङ्मय प्रकाराने आजचे मूळस्वरूप कसे धारण केले. त्याचा प्रारंभ कधी, कोणी केला याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

मराठीतील विज्ञानसाहित्य प्रथम छापले गेले ते इ.स. १८३३ शालिवाहन शके १७५५ मध्ये. हरी केशवजी यांनी 'कॉन्वसेशन ऑन नैचरल फिलॉसॉफी' या ग्रंथाचा जो अनुवाद प्रसिद्ध केला, ते मराठीतील पहिले विज्ञान साहित्य होय. या ग्रंथाचे मराठी नाव 'सिद्‌ध पदार्थ विज्ञान शास्त्रविषयक संवाद' असे होते.

शास्त्रीय सूत्रे कथानकात गुंफून विज्ञानविषयक माहिती सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयोग १९१२ मध्ये वा. गो. आपटे यांनी 'एका दिवसाच्या सुटीत' या दीर्घकथेत केलेला दिसतो. ना.कृ. भावे यांच्या १९१३ यावर्षी प्रसिद्‌ध झालेल्या 'लहान मुलांकरिता शास्त्रीय पाठ' या पुस्तकातही मनोरंजक शास्त्रीय माहिती दिसते. त्यानंतरच्या काळात 'केरळकोकीळ' व 'मनोरंजन' या मासिकांमध्येही अशातऱ्हेचे लेख दिसून येतात.

मराठीतील पहिली विज्ञानकथा म्हणजे (सायन्स फिक्शन स्टोरी) श्रीधर बाळकृष्ण रानडे यांची १९१५ सालामधील 'तारेचे हास्य' ही होय. ही कथा मासिक मनोरंजनमध्ये छापलेली दिसते. या कथेत जगाच्या विनाशाची कल्पना आहे. यानंतर १९५० पर्यंत अगदी तुरळक प्रमाणात विज्ञान कथा सापडतात.

प्रसिद्‌ध तत्वचिंतक कादंबरीकार वा.म.जोशी यांच्या विज्ञानकथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश' या कथेचा नायक बंगाली आहे. वामन मल्हारांची कथा मराठी विज्ञानकथेला बौद्‌धिक आणि वैज्ञानिक परिभाषिकतेची जोड करून देणारी दिसते. वैज्ञानिक परिभाषिकतेचा वापर, मानवी जीवनावर भाष्य आणि मर्म विनोदी शैली हे मराठी विज्ञानकथेचे तिन्ही महत्त्वाचे घटक त्यांच्या विज्ञानकथेत आरंभीच्या काळातच दिसतात.

मराठीत विज्ञानकथेच्या विकासात नियतकालिकांचे व मासिकांचे योगदानही महत्त्वाचे दिसते. 'केरळकोकिळ', 'आनंद', 'मासिक मनोरंजन', 'उदयम', 'चित्रमयजगत', 'सह्याद्री', 'विविधवृत्त', 'विविधज्ञानविस्तार', अशा अनेक नियतकालिकातून पहिल्या वहिल्या विज्ञानकथा प्रसिद्‌ध झाल्या. त्याचप्रमाणे 'धनंजय', 'निशाचर', 'हेर', 'अलिबाबा', 'नाईटकिंग' यांसारख्या रहस्य कथेला वाहिलेल्या मासिकांनी विज्ञानकथा जगविली. त्याचप्रमाणे 'नवल', 'हंस', 'वाङ्‌मयशोभा' या मासिकांनी विज्ञानकथांना भरपूर वाव दिल्यामुळे विज्ञानकथेच्या विकासाचे एक दालन खुले झालेले दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: १९६० च्या दशकात भा. रा. भागवत यांनी युरोपीय विज्ञानकथांच्या केलेल्या दर्जेदार रूपांतरांमुळे मराठीतील विज्ञान कथेला चालना मिळाली. द.पा.खांबेटे, नारायण धारप, भालबा केळकर, यशवंत रांजणकर यांनी विज्ञानकथा लिहिल्याचे दिसते. मराठी विज्ञान कथेविषयी निरंजन घाटे यांनी म्हटले आहे की - "मराठी विज्ञानकथा ही एक तर अनुवादित असते, भाषांतरीत असते किंवा मूळ परकीय कल्पनेवर आधारित असते."[२]

मराठीत विज्ञानकथा व कादंबरीलेखनास प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे विज्ञानकथाकार डॉ.जयंत नारळीकर यांच्या मते "विज्ञानकथा ही निव्वळ भयकथा असू नये, तर कथेने मांडलेले विज्ञानाचे अघोरी स्वरूप वैज्ञानिक दृष्टिकोन जनसामांन्यापर्यंत पोहोचविण्याच्या उद्दिष्टाला बाधक ठरते."[३] कराडच्या आखिल भारतीय मराठी संमेलनात दुर्गाबाई भागवतांनी नारळीकरांच्या विज्ञान कथांचा आदरपूर्वक उल्लेख केला व त्यामुळे खऱ्या अर्थाने विज्ञानकथेला वाङ्‌मयीन मान्यता मिळाली. या काळापासून विज्ञान लेखकांना 'साहित्यिक' पद प्राप्त झालेले दिसते. १९६० च्या सुमारास व नंतर बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, निरंजन घाटे, अरूण मांडे, द.व्य. जहागिरदार, डॉ.यशवंत देशपांडे यांनी सातत्याने लेखन करून विज्ञान कथेचे दालन समृद्‌ध केले आहे. प्रत्येक लेखकाचे विषय निराळे दिसतात. हातोटी वेगळी दिसते. एखादे दुसरे कथाकार वगळता इतर सर्व विज्ञानाचे विद्यार्थी आहेत असे दिसते.

अशाप्रकारे मराठी विज्ञानकथेचा उद्‌य कसा व कधी झाला. पुढे विज्ञानकथेच्या विकासात त्याचा हातभार कसा लागला, त्याचे विवेचन येथे केलेले आहे.

● अन्य भारतीय भाषांतील विज्ञानकथा :-

मराठीप्रमाणेच उडिया, उर्दु, कन्नड, तेलगू, बंगाली अशा काही अन्य भारतीय भाषांमध्येही विज्ञानकथा लेखन झालेले आहे. उडिया भाषेतील विज्ञानकथेचा आरंभ गोकुलानंद महापात्र (१९२३) ह्यांच्या 'पृथ्वी बाहेरील मनुष्य' (१९५४ म.शी) ह्या पुस्तकाने झाला असे म्हटले जाते. काही समीक्षकांच्या मते महापात्रांचे हे पुस्तक म्हणजे केवळ उडिया भाषेतील नव्हे तर अन्य भारतीय भाषांतीलही पहिली विज्ञानकथा होय.

महापात्रांच्या अन्य कादंबऱ्यात 'स्फुटनिक'(१९५८), 'मध्यान्हीचा अंध:कार' (१९५९), 'उडती तबकडी' (१९६३), 'चंद्राचा मृत्यू'(१९६६), 'सोनेरी ओरिसा' (१९७३), ह्यांचा समावेश होता. विज्ञानाचा मानवी जीवनावर आणि संस्कृतीवर होणारा परिणाम त्यांनी प्रासादिक शैलीत आपल्या लेखनातून दाखविला आहे.

नृसिंहचरण पंडा, अमूल्य कृष्ण मिस्त्रा, देवकांत मिश्रा, देवव्रत दा.दास हे अन्य उल्लेखनीय विज्ञानकथाकार होते. इसार असर हे उर्दूतील एक नामवंत विज्ञानकथाकार होते. त्यांनी 'आधी जिंदगी' (१५९९) ह्या कादंबरीत यांत्रिक बुद्धिमत्तेच्या रोबोंचा विषय हाताळला होता. 'अवकाशातील प्रवास' हा त्यांच्या शोलो के इन्सानचा विषय आहे. 'बीस साल बाद' मध्ये अन्य ग्रहावरचा एक वैज्ञानिक, मरणपंथाला लागलेल्या एका वंशाचा इतिहास नोंदवण्यासाठी तल्लख मेंदू कसा तयार करतो हे त्यांनी दाखविले आहे. असर यांनी आपल्या कादंबऱ्यातील विज्ञान सर्वसामान्य माणसाला सहज समजेल अशाप्रकारे मांडलेले आहे.

प्रो. दिवाकर, डॉ.रामन अशा टोपण नावांनीही असर हयांनी विज्ञानकथालेखन केले आहे. असर ह्यांनी वैज्ञानिक आशय असलेल्या कविताही लिहिल्या असून त्यांत विज्ञानाच्या क्षेत्रातील प्रतिभांचा प्रभावी उपयोग करून घेतलेला आहे. गोपाल कृष्ण अडिग ह्यांनी ज्यूल्स व्हर्नच्या कांदबऱ्यांचे कन्नड भाषेत अनुवादन केले आहे. 'राभू' हया नावाने ओळखले जाणारे राजशेखर भूसनूरमथ यांचाही कन्नडमधील विज्ञानकथेच्या लेखनात मोठा वाटा आहे. त्यांच्या काही साहित्यकृती अद्भूततेच्या (फँटसी) अंगाने लिहलेल्या असून, काहीत भविष्यकालीन जगाची अस्वस्थ करणारी चित्रे सशब्द केली आहेत. राभू यांनी बालांसाठीही विज्ञानकथा लिहिल्या आहेत. 'काउन्सिल ऑफ सायन्स फिक्शन ऑथर्स ऑफ इंडिया', (सीएसएफएआय) ह्या संघटनेच्या माध्यमातून राभू हे भारतातील विज्ञानकथालेखकांना एकत्र आणीत आहेत. ह्या संघटनेमार्फत

'इंडियन सायन्स फिक्शन' नावाचे एक त्रैमासिक काढण्याची योजना आहे. जयंत नारळीकर, बाळ फोंडके आणि राभू हे भारतीय विज्ञानकथाकारांच्या लेखनाचा एक प्रतिनिधिक संग्रह प्रसिद्ध करीत आहेत.

तेलगू भाषेत विज्ञानकथालेखन हे काहीसे नवे आहे. राबुरी भारद्वाज हयांच्या 'चंद्रमंडल यात्रा' ह्या कथेत रशियनांबरोबर केलेल्या चंद्रावरील प्रवासाचा वृत्तांत कथेचा नायक देतो, असे दाखविले आहे. यंडामुरी वीरेंद्रनाथ यांच्या 'युगांतम्' हया कादंबरीत एक उल्काभ आणि पृथ्वी यांची टक्कर होऊन युगांत (विनाशाचा दिवस) कसा येतो याचे चित्र उभे केले आहे. रेंतल नागेश्वर राव यांची 'स्त्रीलोकम' ही कथा विषयाच्या दृष्टीने वेगळी आहे. या कथेत स्त्री ही पिता होण्याची शक्यता शास्त्रीय दृष्टीने अजमावली आहे.

बंगाली साहित्यातील सुकुमार रे (१८८७ - १९२३) यांनी लिहलेली 'हेशोराम हंशीयारेर डायरी' (१९२२) ही कादंबरी उल्लेखनीय ठरते. हेमेंद्रकुमार रॉय यांनी एच. जी. वेल्सच्या 'द.इनव्हिजिबल मॅनचे' बंगाली भाषांतर 'अदृश्य मानुष' केले. त्याचप्रमाणे 'कांचेर कॉफिन' ( म.शी. काचेचे कफन), 'मेघदूतेर मर्त्ये' आगमन (म.शी.मेघदूताचे पृथ्वीवर आगमन) इ. त्यांच्या स्वतंत्र कादंबऱ्या होय. मेघदूतेरमध्ये मंगळावर जाऊन पुन्हा पृथ्वीवर परत येण्याची साहसकथा सांगितली आहे. प्रेमेंद्र मित्र यांनी (१९०४-८८) लिहलेल्या 'घानादा' च्या कथाही उल्लेखनीय आहेत. विज्ञान, गुन्हेगारी, साहस यांचे विलक्षण मिश्रण त्यांच्या कथात आढळते. 'आकाशेर आतंक' (आकाशाचे भय), 'दुःखनेर द्वीप' (दुःखनाचे सेट) या त्यांच्या विज्ञानकथांपैकी काही होत. क्षितींद्र नारायण भट्टाचार्य हे प्रेमेंद्र मित्रचे समकालीन लेखक होते. त्यांनी 'अश्वत्थामार वा' (अश्वत्थाम्याचे शहर) या विज्ञानाच्या काही समस्यांवर आधारलेल्या कथा लिहिल्या.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रपटकार सत्यजीत रे (१९२१-९२) हे बंगालीतील अलीकडच्या काळातील एक श्रेष्ठ विज्ञानकथाकार होत. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राध्यापक म्हणून 'प्रा.त्रिलोचन शंकू' ही व्यक्तिरेखा त्यांच्या विज्ञानकथांत येते. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या विविध शाखातील तपशिलांचे निर्देश या कथांतून येतात. 'मन्रो द्वीपेर रहस्य' (मन्रो द्वीपाचे रहस्य), 'शंकू ओ आदिम मानुस' (शंकु आणि आदिम माणूस) या त्यांच्या शंकुकथांपैकी काही विशेष उल्लेखनीय कथा होत.

आधुनिक बंगालीतील नामवंत कवी आणि कादंबरीकार सुनील गंगोपाध्याय (१९३४) यांनी काही विज्ञानकथा लिहिल्या आहेत. पृथ्वीपलीकडच्या ग्रहांशी संबंध व त्यांचे परिणाम 'अँटी - मॅटर' (प्रतिद्रव्य) असे विषय त्यांच्या काही विज्ञानकथांतून त्यांनी हाताळलेले आहेत. सुनील गंगोपाध्याय यांचे समकालीन असलेले शीर्षेंदू मुखोपाध्याय यांच्या विज्ञानकथांपैकी 'पगला गणेश' आणि 'बॉनी' या विशेष उल्लेखनीय कथा ! संगणक विज्ञानाच्या आधारेही शीर्षेंदू यांनी काही कथा लिहून विज्ञानकथालेखन केले आहे.

सय्यद मुस्तफा सिरोज यांच्या विज्ञानकथांतून आपल्या तल्लख बुद्धिमत्तेने अनेक गूढांचा वैज्ञानिक अर्थ लावणारी 'कर्नल नीलाद्री सरकार' ही व्यक्तिरेखा संस्मरणीय ठरते. बंगालीतील अन्य विज्ञानकथालेखकांमध्ये विमल कार, आदिश संकर्षण रे, समरजित कार, अनिश देव, किन्नर रॉय, सिद्धार्थ घोष, निरंजन सिंह, इत्यादींचा समावेश होतो.

भारतीय भाषांमधील साहित्यात विज्ञानकथा ही कमी अधिक प्रमाणात रुजलेली असून मराठी व बंगाली यांसारख्या काही भाषांच्या साहित्यांत तिने चांगला जोम धरला आहे. 'इट हॅपन्ड टूमॉरो'(१९९३) हा भारतीय विज्ञानकथांचा प्रतिनिधिक संग्रह बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथेसंबंधीच्या दीर्घ प्रस्तावनेसह 'नॅशनल बुक ट्रस्ट' ने प्रकाशित केलेला आहे.

विज्ञानकथांवर आधारलेले चित्रपट फ्रेंच चित्रपटकार जॉर्ज मेल्ये यांच्या 'द लॅबोरेटरी ऑफ मेबिस्टोफीलीस' (१८९६) हया चित्रपटापासून निघू लागले. त्यातून काही निर्देशनीय म्हणजे 'ट्वेंटी थाऊजंड लीग्ज अंडर द सी' (१९१६), 'फ्रॉम द अर्थ टू द मून' (१९५८), 'जर्नी टू द सेंटर ऑफ द अर्थ' (१९५९), 'ए स्पेस ओडिसी' (१९६८) हे होत. दूरदर्शनचे माध्यम प्रभावी झाल्यामुळे त्यावर विज्ञानकथांवरील चित्रपट, मालिका दाखविल्या जाताना दिसतात.

तात्पर्य, अन्य भारतीय भाषांमध्ये विज्ञानकथा लिहिल्या जात आहेत.त्याचप्रमाणे अनेक नवे विज्ञानकथाकार विविध विषयांवर विज्ञानकथा लिहित आहेत.

## ३. विज्ञान कथाविषयक मासिके व नियतकालिके :-

- **पाश्चात्य मासिके व नियतकालिके :-**

'हयुगो' या अमेरिकन संपादकाने १९२६ मध्ये सुरु केलेले 'अमेझिंग स्टोरीज' या मासिकाचे प्रकाशन ही विज्ञानकथेच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. या मासिकात विज्ञानकथेसाठी 'अमेझिंग स्टोरीज' असे विशेषण वापरले गेले. त्यानंतर 'अस्टाउंडिग

स्टोरीज', 'वंडर स्टोरीज', 'एअर वंडर स्टोरीज', 'स्टार्टलिंग स्टोरीज', अशी वेगवेगळी नावे विज्ञानकथांना देण्यात आलेली दिसतात. हयुगो गर्नझ्बॅक यांनी विज्ञानकथांना 'साईंटिफिक्शन' असे म्हणावयास सुरुवात केली. गर्नझ्बॅक यांनी आपल्या मासिकांच्या मुखपृष्ठावर 'अमेझिंग स्टोरिज' दि मॅगेझिन ऑफ साईंटिफिक्शन अशी बिरूदावली लावलेली दिसते. पुढे गर्नझ्बॅक यांना अमेझिंग स्टोरीज सोडावे लागले. इ.स. १९२९ मध्ये त्यांनी 'सायन्स वंडर स्टोरीज' मध्ये, सायन्स वंडर स्टोरीज हे नवे मासिक सुरू केले. जून १९२९ च्या या पहिल्याच अंकांत या मासिकाच्या संपादकांनी 'सायन्स फिक्शन' हा शब्द वापरला आणि तो प्रचारात आणलेला दिसतो.

सुमारे १९३० नंतर विज्ञानकथेबद्दलचे आकर्षण पश्चिमी जगात वाढत चालले होते. विज्ञानकथेला वाहिलेली नियतकालिके निघू लागली. 'मॅगझिन ऑफ फँटसी ॲन्ड सायन्स फिक्शन' (१९४९) आणि 'गॅलक्सी सायन्स फिक्शन' (१९५०) ही दोन विशेष उल्लेखनीय नियतकालिके होय. परिषदा, परिसंवाद यातून विज्ञानकथेवर चर्चा होऊ लागली. दरवर्षी भरणाऱ्या 'द वर्ल्ड सायन्स फिक्शन कन्व्हेन्शन' मध्ये उत्कृष्ट विज्ञानकथेसाठी 'ह्युगो' पुरस्कार प्रदान करण्यात येऊ लागले. तसेच द सायन्स फिक्शन रायटर्स ऑफ अमेरिका हया संघटनेतर्फे 'नेन्यूला' पुरस्कार देण्यात येऊ लागले. ही संघटना विज्ञानकथांचे संग्रह प्रकाशित करते.

अमेझिंग स्टोरीज, सायन्स वंडर स्टोरीज, अस्टाउर्डिंग स्टोरीज, यासारखी विज्ञानकथांना वाहिलेली मासिके इंग्रजी साहित्यात सुरू झाली. पुढे १९३८ मध्ये जॉन. डब्ल्यू. कॅम्पबेल यांनी 'अस्टाउंडिंग' ची सूत्रे हाती घेतल्यावर या मासिकाचे नाव 'अस्टाउंडिंग सायन्स फिक्शन' असे ठेवण्यात आले. कॅम्पबेल यांचे हे महत्वाचे कार्य आहे.

सुरूवातीच्या काळात या मासिकांचे स्वरूप फारसे आकर्षक नव्हते. त्या काळी विज्ञानकथेला प्रतिष्ठाही नव्हती. अतिशय भडक चित्रे, निम्न दर्जाचा कागद आणि सदोष छपाई याचबरोबर विज्ञानकथांचे अद्भुतिकासदृश्य कथानक, यामुळे ही मासिके वाचणे हीन अभिरूचीचे व कमीपणाचे मानले जाई. गर्नझ्बॅक यांना सुरूवातीच्या काळात वाचकांना आकर्षित करण्यासाठी वेल्स आणि व्हर्न यांच्या कथा पुर्नमुद्रित कराव्या लागल्या. पुढे अमेरिकन तरूण लेखक या कथा प्रकाराकडे आकर्षित झाल्यावर ही स्थिती कालांतराने बदलली.

'अस्टाउंडिंग स्टोरिज' , 'अमेंझिंग' आणि 'थ्रिलींग वंडर स्टोरीज' ही मासिके समकालीन मानली जातात. यापैकी 'अस्टाउंडिंग' विशेष दर्जेदार होते. सायन्स वंडर स्टोरीज, एअर वंडर

स्टोरीज या मासिकांनाही बऱ्यापैकी वाचकवर्ग उपलब्ध होता. ह्युगो गर्नझ्बॅक यांनी १९५० च्या सुमारास 'सायन्स फिक्शन प्लस' नावाचे मासिक सुरू केले, परंतू ते अल्पायुषी ठरले.

काळाच्या ओघात विज्ञानकथा विषयक मासिकांच्या स्पर्धेत 'कॉमिक्स' अवतरल्यावर मोठा वाचकवर्ग, विशेषत: किशोरवयीन त्याकडे आकर्षित झाला आणि या मासिकांना उतरली कळा आली. इ.स. १९४० च्या सुमारास 'कॉमिक्स' ची लोकप्रियता विलक्षण होती. या लाटेत विज्ञानकथा मासिके टिकाव धरू शकली नाहीत. या लाटेतही टिकून राहिलेल्या मासिकांनी विज्ञानकथाविश्व समृद्ध केले. होरॅस गोल्ड यांनी १९५५ मध्ये सुरू केलेले 'गॅलॅक्सी', आयझॅक असिमोव्ह यांचे १९७८ मध्ये सुरु झालेले 'असिमोव्हज', 'सायन्स फिक्शन ॲडव्हेंचर मॅगेझिन' यासारखी काही उदाहरणे या संदर्भात देता येतील.

● **मराठी मासिके व नियतकालिकांचे योगदान :-**

मराठी विज्ञानकथेच्या वाटचालीत नियतकालिकांचे योगदानही महत्त्वाचे आहे. 'केरळ कोकिळ' ने ज्यूल्स व्हर्नच्या विज्ञानकादंबरीचा अनुवाद छापला. आनंद, मासिक मनोरंजन, उदयम, चित्रमयजगत, सहयाद्री, विविधवृत्त, विविधज्ञानविस्तार अशा अनेक नियतकालिकांतून पहिल्यावाहिल्या विज्ञानकथा प्रसिद्ध झाल्या. तशा नंतरही होत राहिल्या. पहिले 'सृष्टीज्ञान' इ.स. १८८६ ला कार्यरत आहे. त्यात दोनशे साठ विज्ञानकथा प्रसिद्ध झाल्या. विज्ञानसाहित्यावरील चर्चासत्रांचे अहवाल त्यात आले. विज्ञान साहित्य विशेषांक निघाले. "इ.स.१९६८ साली सुरू झालेले 'विज्ञानयुग' इ.स.२००१ पर्यंत चालले. त्यांचे काही विज्ञानकथा विशेषांक निघाले. त्यातून पुष्कळ लेखक लिहिते झाले. मध्यवर्ती काळात काही लेखकांनी याकडे पाठ वळविलेली होती. अशा वेळी 'धनंजय', 'निशाचर', 'हेर', 'अलिबाबा', 'नाईटकिंग' यासारख्या रहस्यकथेला वाहिलेल्या मासिकांनी विज्ञानकथा जगविली,"[४] असे मत निरंजन घाटे यांनी नमूद केले आहे.

तथापि या संदर्भात अनंत अंतरकर यांच्या 'नवल' मासिकाचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे. 'नवल' चे आरंभीचे स्वरूप डायजेस्ट मासिकाचे होते. ते बदलून उपेक्षित कथाप्रकारांना वाहिलेले मासिक म्हणून इ.स. १९५८ पासून नवलचा कायापालट झाला. विज्ञान कथेबरोबरच भयकथा, गूढकथा, विस्मयकथा, रहस्यकथा यांनाही नवलने आश्रय दिला. 'केरळकोकिळ' मध्ये शास्त्रीय माहिती असलेले काही लेख दिसतात. त्यामध्ये सिलोनमधल्या 'पाचूच्या खाणी', 'दक्षिण अमेरिकेतले विविध प्राणी', 'आफ्रिकेच्या जंगलातील बुरके (पिग्मी)' अशा प्रकारचे लेख होते. राईट बंधूंच्या प्रयत्नांची माहितीही थोडक्यात केरळकोकिळमध्ये आलेली दिसते.

मासिक मनोरंजनमध्येही विविध लेख प्रसिद्ध झाले. त्यात पहिल्या महायुद्धातील शस्त्रास्त्रांची, लढाऊ बोटींची सचित्र माहिती आहे. मात्र यात शास्त्र कमी मनोरंजन जास्त असा मजकूर दिसतो.

प्रथम १९५७ - ५८ ला 'नवल' मासिकाचं स्वरूप बदलल गेलं आणि उपेक्षित वाङ्मय प्रकाराना वाहिलेलं मासिक असं बिरूदं झळकवत नवल नं विज्ञानकथा छापायला सुरूवात केली. नवलचं भावंड 'हंस' हे आधीपासून अधूनमधून विज्ञानकथा छापत होते. तसेच भालबा केळकरांच्या कथा 'वाङ्मय शोभे' नं छापल्या. या काळानंतर 'नवलं' व 'हंस' मधून द.चि.सोमण, द.पा.खांबेटे, ग.रा.टिकेकर, दि.बा.मोकाशी, बाळ फोंडके, गजानन क्षीरसागर, धनंजय जोशी, श्रीनिवास सारंगपाणी, प.ग.सुर्वे, श.ह.देशपांडे, यशवंत रांजणकर, शुभदा गोगटे व इतरही अनेकांनी विज्ञानकथा लिहिल्या.

'सायन्स टुडे' या विज्ञानविषयक नियतकालिकाच्या प्रत्येक अंकात एक विज्ञानकथा नियमित प्रकाशित होते. या नियतकालिकातील बहुतांश कथा या 'अन्य भाषेतील मूळ कथेचे इंग्रजी रुपांतर' अशा स्वरूपाच्या आहेत. उदा. 'दि. रेअर आयव्हील ऑफ गणेश' जयंत नारळीकर (मूळ कथा-उजव्या सोंडेचा गणपती ) 'दि साऊथ पॉ स्ट्रेन' -बाळ फोंडके, 'ब्रेन चाइल्ड', निरंजन घाटे (बृहस्पतीचा देह), 'दि ट्रेटर'-लक्ष्मण लोंढे (गद्दार) ही उदाहरणे या संदर्भात पुरेशी वाटतात. याशिवाय धनंजय, छात्रप्रबोधन, लोकमत, पोलीस टाईम्स, यज्ञ, इये मराठीचिये नगरी, माझी मैत्रीण यासारख्या मासिकांतून, नियतकालीकेतून विज्ञानकथा प्रसिद्ध होतात. विज्ञानकथांची अनेक नियतकालिके जोमाने चालली आहेत.

## ४. मराठी विज्ञानपरिषदेचे कार्य :-

मराठी विज्ञान परिषद १९७० पासून कार्य करताना दिसून येते. मराठी विज्ञान परिषदेची स्थापना मुंबई येथे झालेली असून, मराठी विज्ञान परिषद दरवर्षी विज्ञानसाहित्याचा प्रसार होण्यासाठी व लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी विविध उपक्रम राबविताना दिसते. विज्ञान परिषदेमार्फत दरवर्षी उत्कृष्ठ विज्ञानकथेला पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार अनेक मान्यवर विज्ञानकथा लेखकांना मिळालेला आहे. त्यामुळे अनेक विज्ञानकथा लेखकांना प्रेरणा मिळत गेल्याने त्यांनी नवनवीन विषय आपल्या कथेतून मांडलेले दिसतात.

मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान विषयक परिसंवाद, चर्चासत्रे, प्रदर्शने, संमेलने, व्याख्याने, विविध स्पर्धा असे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यामुळे साहजिकच विज्ञान साहित्याचा विकास व विस्तार होताना दिसत आहे. विज्ञानकथा ही लोकप्रिय होत आहे व विज्ञान साहित्याकडे वाचकवर्ग मोठ्या संख्येने वळताना दिसून येतो आहे.

विज्ञान परिषदेतर्फे दरवर्षी ज्या तीन कथा पारितोषिकासाठी निवडल्या जातात, त्या 'विज्ञानिनी' या कथासंग्रहात १९७० ते १९८० च्या दर वर्षी पहिल्या आलेल्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यात परीक्षकांचे अहवालही आहेत. त्यामध्ये विज्ञान परिषदेच्या परीक्षकांची मते मांडलेली आहेत. विषयांची विविधता अभावानेच जाणवते म्हणून कथांची निवड करताना खालील तीन घटक हे विचारात घेतले जातात.

१) कथेची विज्ञानगर्भता.

२) विज्ञान कथेचे साहित्यिक रूप.

३) विज्ञान आणि जीवन यासंबंधी जाण हे घटक विज्ञानकथेचे निकष आहेत.

विज्ञानकथेला इतर कथांच्या मानाने वाचक कमी मिळतात. कारण विज्ञानविषय प्रारंभी रसविघ्नांना प्रारंभ होताना दिसतो. म्हणूनच खऱ्या चांगल्या प्रकारच्या विज्ञानकथेचे हे तीन निकष ठरवलेले दिसतात. विज्ञान कथा लेखकांचे व वाचकांचे मेळावे वरचेवर जागोजाग भरविणे, परस्परात चर्चा होण्यासाठी प्रयत्न करणे हेही काम विज्ञानपरिषद करते. विज्ञान परिषद गेली ४२ वर्षे कार्यरत असून सर्व जिल्ह्यात त्यांच्या शाखा आहेत. गोवा, बडोदा येथेही या शाखा आहेत. ही परिषद वेगवेगळे कार्यक्रम राबविते उदा. निबंध स्पर्धा, विज्ञानकथास्पर्धा आयोजित करते. तसेच शिक्षकांसाठीही विज्ञान प्रशिक्षण देते. निरनिराळ्या विज्ञान पुस्तकांचे प्रकाशन करते. वेगवेगळे प्रकल्प राबविते उदा. आकाशवाणीवर कार्यक्रम सादर करणे. तसेच विज्ञान तंत्रज्ञान कोष काढण्यात येणार आहे.

मराठी विज्ञान परिषद सातत्याने विज्ञान लेखक शिबिर आयोजित करते. या शिबिरात विज्ञान कथेवर चर्चा होते. तसेच अहवालही प्रसिद्ध केले जातात. मुंबई विद्यापीठात परिषदेच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानसाहित्य या विषयावर चर्चासत्र आयोजित केले जाते. औरंगाबाद येथे १९९४ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विदयमाने दहावा विज्ञान लेखक मेळावा घेण्यात आला होता. त्यात विज्ञानकथा लेखन यावर निबंध वाचले

गेले. त्यानंतर याच विद्यापीठाने मराठवाडा साहित्य परिषदेच्या संयुक्त विदयमाने १९९९ साली विज्ञानकथा या विषयावर अत्यंत यशस्वी चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्राचे वैशिष्ट्य म्हणजे, जेष्ठ साहित्यिक, श्रेष्ठ टिकाकार व श्रेष्ठ विज्ञानकथाकार यांना एकाच व्यासपीठावर आणले. इ.स.२००० चा अंक या चर्चासत्रावर काढला गेला. विज्ञानकथेच्या संदर्भात हा अंक मैलाचा दगड ठरावा असा आहे.

भारतातील सामान्य वाचक युरोप, अमेरिकेतील सामान्य वाचकांइतके विज्ञान जागृत नाहीत. तेथे विज्ञान सतत आजूबाजूला असते. त्यामुळेच कथेतील विज्ञान व त्यांच्या सभोवतालचे विज्ञान यामध्ये त्यांना फरक वाटत नाही. आपल्या खेड्यातील असंख्य वाचकांना विज्ञानाची तोंडओळख देखील नसते. त्यांना विज्ञानाची तत्त्वे सोप्या भाषेत सांगितली पाहिजेत. यासाठी मराठी विज्ञान परिषदे बरोबर सर्वांनीच प्रयत्न करणे आवश्यक आहे. तात्पर्य, विज्ञानपरिषदेने मराठी विज्ञानकथेच्या विकासासाठी केलेले कार्य खूप मोलाचे आहे.

## ५. विज्ञान व साहित्य परस्पर संबंध :-

विज्ञान व साहित्याचा परस्पर निकटचा संबंध दिसून येतो. साहित्य ही जीवनवेधी कला आहे. साहित्यात मानवाच्या सर्व पैलूंचे, जीवनाचे दर्शन होते व विज्ञान हा मानवाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनल्यामुळे साहजिकच विज्ञानाचे चित्रण साहित्यात होताना दिसते.

दुसऱ्या महायुध्दात विज्ञानाची विनाशक शक्ती जगाला दिसली. हिरोशिमा व नागासाकी ह्या शहरांवर अणुबाँब टाकले गेले आणि प्रचंड मानवसंहार घडवून आणण्यात आला. मानवी समाज आणि मानवी मूल्ये ह्यांच्यावर विज्ञान किती भयंकर आघात करू शकते. ह्याची अनेकांना जाणीव झाली. परिणामत: मानवी सहानुभूतीचे क्षेत्र विस्तारले. ह्याचा परिणाम विज्ञानकथेवरही अपरिहार्यपणे झाला. विज्ञानकथेत सामाजिक समस्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचा एकंदर मानवी समाजावर काय परिणाम होऊ शकेल, ह्यांचा विचार विज्ञानकथेत होऊ लागला. त्यामुळे विज्ञानकथा आणि सामाजिक वास्तव ह्यांत एक जिव्हाळ्याचे नाते उत्पन्न झाले आणि ह्यातून विज्ञानकथेचा वाचकवर्गही वाढला.

साहित्याच्या विविध शाखा आहेत. त्यातील विज्ञान साहित्याची शाखा अलिकडे उदयास आलेली आहे. अशा साहित्यात मानवाने केलेली प्रगती, विविध शोध यांचे दर्शन होते. साहित्य ही जीवनवेधी कला असल्याने मानवी जीवनाला व्यापून आणि वेढून राहणाऱ्या विज्ञानाचेही चित्रण

साहित्यात येते. विज्ञान आणि मानवी जीवन यातील संघर्ष, समन्वय आणि ताण यांचे दर्शन विज्ञानकथेतून घडते. हे जीवन भूतकालीन, क्वचित वर्तमानकालीन, बहुधा भविष्यकालीन असते.

आजच्या भक्कम वैज्ञानिक पुरावा आणि बुद्धीनिष्ठ अंदाज यांच्या आधाराने भावी काळात कोणते शोध लागतील, काय घडू शकेल, त्याचा मानवी जीवनावर कोणता परिणाम होईल, यांचे चित्रण विज्ञानकथा रंगविते. एक कल्पना फलित नवसृष्टी त्यातून उभी राहते. ही कल्पनासृष्टी आपल्या नित्याच्या दैनंदिन वास्तव विश्वापेक्षा एका बाजूने भिन्न असते तर दुसऱ्या बाजूने या ना त्या प्रकाराने त्या वास्तवविश्वाशी अनुबंधित असते. कल्पना आणि वास्तव, सौंदर्य आणि सत्य यांचा एक ताळमेळ विज्ञानकथेत साधलेला असावा लागतो.

विज्ञानकथा ही एक ललित साहित्यकृतीच असते. त्यामुळे तिला विज्ञानाचे अधिष्ठान असलेच पाहिजे. तसेच तिचे मूल्यमापन करताना कथा, कादंबरी, नाटक यांसारख्या साहित्यकृतीच्या मूल्यमापनासाठी समीक्षेचे जे निकष वापरले जातात,तेच येथेही लावले पाहिजेत. विज्ञानकथा ही एक साहित्यकृतीच असल्यामुळे विविध विज्ञानकथाकारांच्या वेगवेगळ्या दृष्टिकोनाचा प्रभाव त्यांनी लिहिलेल्या विज्ञानकथांवर होतो. त्यामुळे विज्ञानकथा या रंजनात्मक, उद्बोधक किंवा रंजन उद्बोधनापलीकडे जाणाऱ्याही असतात. मात्र वैज्ञानिक विषयांचे विवेचन करणे हा तिचा हेतू मानल्यास तिच्या साहित्यिक स्वरूपाला बाधा येते.

जीवन व विज्ञान ही वेगळी नाहीत. ती एकमेकांशी पूर्ण संबंधित आहेत. पहिल्या विस्तवाच्या शोधापासून ती संबंधित आहेत. उदा. विस्तवाचा शोध लागला, चाकाचाही शोध लागला, असेच आपण पुढे चाललो आहोत. उदा. टेलिव्हिजनची कल्पना सुद्धा जीवनामध्ये नव्हती पण आज ती प्रत्यक्षात आहे. विज्ञान साहित्य हे निश्चितपणाने उत्कृष्ट ललित वाङ्मय झालेले आहे. कारण नाटकाच्या क्षेत्रात सुद्धा विज्ञानाने आता आक्रमण करायला सुरूवात केलेली आहे, तसेच ती कार्टुनच्या क्षेत्रातही केलेली आहे. लक्ष्मणचे 'सायन्स स्माइल्स' या नावाचे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते की, वैज्ञानिक विषयावर सुद्धा व्यंगचित्रात्मक उत्कृष्ट विनोद करता येतो.

माणसाची आपल्या भोवतालच्या जगाबद्दल, जगातील वस्तूमात्रांबद्दल, प्राणिमात्रांबद्दल, वनस्पतींबद्दल जिज्ञासा असते. या जिज्ञासेतून विज्ञानसाहित्य विकास पावते.

भारतीय भाषांतील विज्ञानकथेचे कथानक नेहमी मानवजातीशी संबंधित, माणूस केंद्रवर्ती ठेवून रचलेले दिसते. वैज्ञानिक प्रगती आणि मानवी भावभावना यांचा आंतरसंबंध किंवा वैज्ञानिक

विकास आणि समाजाची पायाभूत तत्त्वे यांचा आंतरसंबंध यावर ही कथानके आधारलेली दिसतात. आधुनिक जगात विज्ञान व तंत्रविदयेला विशेष स्थान व महत्त्व असून मानवी जीवनव्यवहाराची जवळ जवळ सर्वच क्षेत्रे त्यांनी व्यापली आहेत. शेती, अन्नधान्य, आरोग्य, पोषण व वैदयक व्यवसाय, उद्योगधंदे व औदयोगिक विकास, नैसर्गिक साधनसंपत्ती, वाहतूक, माहिती व जनसंपर्क, शिक्षण, मनोरंजन अशा सर्व क्षेत्रात मानवी जीवनाचे कल्याण साधण्याची प्रभावी साधने म्हणून विज्ञानाला असाधारण महत्त्व आहे.

वैज्ञानिक ज्ञान फार झपाट्याने विस्तारत गेले आहे. अज्ञानाताचा चिकित्सक पद्धतीने सतत शोध घेण्याच्या मानवी वृत्तीतून विज्ञानाचा आजवरचा विकास, विस्तार घडून आला आहे. आणि त्या सर्वांचे प्रतिबिंब विज्ञानसाहित्यात पडताना दिसून येते. वैज्ञानिकांनी कलेला आपले म्हटले आहे. साहित्याची जाण असणारे अनेक वैज्ञानिकही आहेत. साहित्यिक आणि वैज्ञानिक यांनी परस्पर संबंध निर्माण करून एकमेकांशी चर्चा करून आपापल्या क्षेत्राची दालने उघडी केली पाहिजेत. ''विज्ञान आणि साहित्य एकत्र आले तरच सध्याचे अनेक भेदाभेद नष्ट होऊन एक वैश्विक समाज अस्तित्वात येऊ शकेल''[५], असे रॉबर्ट ओपेन हायमर म्हणतात.

'ललित विज्ञान' या प्रकारात विज्ञानकथा, विज्ञान कविता, विज्ञान कादंबरी, विज्ञान नाटिका यांसारख्या सर्वच ललित वाङ्‌मयप्रकारांचा समावेश होतो. तरीही लघुकथा व कादंबरी या दोन प्रकारांचा विकास झाल्याचे दिसते. इतर साहित्य फारसे लिहले गेले नाही असे दिसते.

'विज्ञान साहित्य' ही संज्ञा बरीचशी ढोबळ आणि सर्वसमावेशक आहे. या साहित्यप्रकारात विज्ञानाशी संबंधित सर्वच साहित्यप्रकार उदा. विज्ञानविषयक लेख, निबंध, ललित विज्ञानसाहित्य वगैरे समाविष्ठ होतात.

## ६. विज्ञान साहित्याच्या प्रेरणा आणि वैशिष्ट्ये :-

- **विज्ञान साहित्याच्या प्रेरणा :-**

विज्ञान साहित्याचे उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीमध्ये वैज्ञानिक वृत्ती रुजवणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणे. निसर्गातील व मानवी जीवनव्यवहारातील समग्र, व्यक्तिगत, सामाजिक, सांस्कृतिक इ. घडामोडींचे विज्ञाननिष्ठ दृष्टीने आकलन व चिकित्सा करणे होय.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून जीवन व्यवहाराकडे पाहणे याचा अर्थ जिज्ञासू व चिकित्सक वृत्ती, वस्तुनिष्ठ विचारपद्धती आणि तर्कधिष्ठित बुद्धिवादी दृष्टिकोन स्वीकारणे होय. निसर्गात घडणाऱ्या

घटना निसर्ग नियमांनुसारच घडतात, त्यात स्पष्ट कार्यकारणाभाव असतो. एका व्यक्तीला हा कार्यकारणभाव समजला की ते ज्ञान सर्वांना देता येते. म्हणूनच यात अंधश्रध्दा, रुढी, प्रामाण्य विभूतिपूजा अशा प्रवृत्तींना थारा नसतो. त्यामुळे अशा अवैज्ञानिक प्रवृत्तींचा व्यक्तींवरील व समाजमानसावरील पगडा दूर करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन व बुद्धिवादी विचारसरणी समाजात रुजविणे या विज्ञान उद्दिष्ट्यातूनच विज्ञानसाहित्याला प्रेरणा मिळाली व वेगवेगळ्या विषयांवर हे साहित्य लिहिले गेले.

वैज्ञानिक ज्ञानाची एक कसोटी म्हणजे शक्य तितक्या अचूक वस्तूनिष्ठतेच्या पायावर ज्ञानाची उभारणी करणे होय. ते बुद्धिप्रामाण्याधिष्ठित असावे लागते. विज्ञानाचे निष्कर्ष केव्हांही तपासता येतात. त्यांचे प्रामाण्य शाबीत करता येते किंवा ते कसोटीस न टिकल्यास फेटाळता येते. त्यामुळेच ते परिवर्तनशील असते.

विज्ञानाच्या अभ्यासात तत्त्वे, सिद्धांत व उत्पत्ती यांच्या बरोबरीनेच प्रत्यक्ष निरीक्षणे, प्रयोग व प्रात्यक्षिके या घटकांनाही फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे विज्ञानकथा काल्पनिक असल्या तरी त्याला वास्तव सत्याचा स्पर्श व्हावा लागतो.

विज्ञान व तंत्रविदया यांच्या शिक्षणाची व्याप्ती खूप मोठी असून त्यात अनेकविध विषयोपविषयाचा अंतर्भाव होतो. रसायनशास्त्र, भौतिकी, जीवविज्ञान, गणित, खगोलशास्त्र इ. निसर्गविज्ञान त्यात येतात. ही सर्व विज्ञान मूलभूत विज्ञान म्हणून ओळखली जातात. ही प्रामुख्याने तत्त्वे व तथ्ये विशद करणारी विज्ञान आहेत. मानवी जीवन सुखी व सुरक्षित करण्यासाठी उपयोजित विज्ञानाच्या साहाय्याने अनेकविध तंत्रसाधने निर्माण केली जातात. यातून विज्ञान साहित्य लेखनाला प्रेरणा मिळत आहे.

मनुष्याचे व्यक्तिगत व सामूहिक जीवन, वर्तनविशेष, कृती व त्यामागील प्रेरणा, उद्दिष्ट इ. अभ्यास सामाजिक शास्त्रामध्ये केला जातो. समाजशास्त्र, मानवशास्त्र, पुरातत्वविदया, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र व सामाजिक शास्त्र या शास्त्राचा अभ्यास करताना त्यातही विज्ञानाचा उपयोग वाढत असल्याचे दिसते.

पृथ्वीतलावर मानव जेंव्हा निर्माण झाला तेंव्हापासून त्याने आपल्या अवती भोवती असणाऱ्या जगाकडे कुतुहलातून नजर फिरविली. त्याला या विश्वातील कितीतरी नवनवीन गोष्टी पहावयास मिळाल्या. त्या गोष्टीचे त्याने ज्ञान करून घेतले. मानवाची ही जी मूलतः ज्ञानसाधना

म्हणजेच सुरूवातीच्या काळातील विज्ञान होय. आजच्या विज्ञानाचे सारेच स्वरूप वस्तूनिष्ठ झाले आहे. आज विज्ञानाच्या मूळ वृक्षाला नवनवीन विज्ञानशाखांची रोपटी येऊन ती शहरात बहरत असल्याचे पहावयास मिळत आहे, या विज्ञानशाखांचा समाजाच्या कल्याणासाठी उपयोग होत आहे. अशा या विज्ञानाचे स्वरूप नेमके कसे आहे, विज्ञानातून तंत्रज्ञान कसे उद्यास आले आहे, विज्ञानामुळे समाजाची प्रगती कशी झाली, समाज अंधश्रद्धांच्या शृंखलातून कसा मुक्त होत आहे, त्या अंधश्रद्धेचा समाज विज्ञाननिष्ठ कसा बनविता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे होते. यातूनच अनेकांना प्रेरणा मिळत गेली व अनेकांनी विज्ञान साहित्य लिहायला सुरूवात केली.

आज आपण एकविसाव्या शतकाच्या प्रारंभाला आजपर्यंत कुशाग्र मानवाने विज्ञानाच्या क्षेत्रात केलेली प्रगती पाहिली, तर ती निश्चितपणे नेत्रदीपक आहे. एकेकाळी रानावनात राहणारा, ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण व्हावे या हेतुने गुहेत आश्रय घेणारा, अर्धनग्न अवस्थेत वणवण फिरणारा, घासभर अन्नासाठी दूरवर भटकंती करणाऱ्या मानवाने स्वतःचे अस्तित्व तर टिकवलेच शिवाय निसर्गावर सुद्धा विजय मिळविला आहे. मानवाने प्रगतीची अनेक शिखरे काबीज केलेली आहेत. पण एवढ्या या यशावर त्याने कुतुहल थांबलेले नाही तर तो नवनवीन गोष्टीचा शोध घेतच आहे. त्या शोधाचा आपल्या मानवी समाजाला कसा उपयोग होईल याचा विचार करत आहे. आज विज्ञान व तंत्रज्ञान हे सुखी जीवनासाठी वरदान ठरलेले आहे आणि या सर्वांचे चित्रण विज्ञान साहित्यात होत आहे.

समाजातील अंधश्रद्धा नष्ट करणे व विज्ञाननिष्ठ समाज व्यवस्थेला बैठक प्राप्त करून देणे हे फक्त शास्त्रज्ञांचे काम नाही, तर सर्व समाजातील लोकांचे काम आहे. त्यासाठी वैज्ञानिक दृष्टी सर्वांना लाभली पाहिजे. यासाठी विज्ञानसाहित्य लिहिले पाहिजे याची जाणीव वैज्ञानिकांना झाली. वैज्ञानिक दृष्टिकोनातून विज्ञानकथा, विज्ञानसाहित्याचा विकास होत गेला. विज्ञानकथा जसजशा वाढत जातील तसतशा अंधश्रध्दा कमी होतील. यासाठी बुद्धिप्रामाण्यवादी बनून बुद्धीला पटेल तेच खरे मानून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी साठवणे महत्त्वाचे आहे.

समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी स्वतःजवळ स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हवी. जो दृष्टिकोन सुसंघटित, सूत्रबद्ध, वस्तुनिष्ठ अनुभवाने निश्चित असतो, त्यास वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणतात. हा दृष्टिकोन विज्ञानसाहित्यादून लोकांना मिळताना दिसून येतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन अगदी सहज निर्माण झालेला नाही तर त्यासाठी अनेक महान शास्त्रज्ञांनी स्वत: हाल, अपेष्टा, तुरूंगवास भोगला आहे. जगाची वाटचाल विज्ञानपूर्व अवस्थेतून बाहेर पडून विज्ञानाच्या दिशेने ग्रीक संस्कृतीतून सुरू झालेली दिसते. साधारणत: याच काळात आधुनिक विज्ञानाला सुरूवात झाली असे मानले जाते. इ.स. १६ व्या शतकात वैज्ञानिक दृष्टीचा पुरस्कार करून विज्ञानाच्या प्रगतीस चालना देण्याचे कार्य इंग्रज कायदेपंडित फ्रान्सीस बेकन याने केले.

विसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञान हा वेग पूर्वीपेक्षा उत्तरोत्तर वाढत गेला. १९५७ मध्ये रशियाने पहिला मानवनिर्मित उपग्रह अंतराळात सोडला. १९६९ मध्ये अमेरिकन अंतराळवीर नील आर्मस्ट्राँगने चंद्रावर पहिले पाउल ठेवले. प्राणिशास्त्रात अनेक शाखा तयार झाल्या आहेत. जैव तंत्रज्ञान या शाखेत अनेक आश्चर्यकारक शोध लावले जात आहेत. 'डॉली' या मेंढीचे क्लोनिंग करून प्रतिडॉली तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे व जगाच्या वैज्ञानिक इतिहासात एक क्रांतिकारी घटना घडली आहे.

विसाव्या शतकात वैदयक शास्त्रामध्ये बहुतेक सर्व रोगावरील उपाययोजना शास्त्रज्ञांनी शोधून काढल्या आहेत. उदा. प्लास्टिक सर्जरी, हदयरोपण शस्त्रक्रिया. तसेच पदार्थ विज्ञानशास्त्रात इ.स. १९०० साली जर्मन शास्त्रज्ञ मॅक्स प्लॅक याने शक्तिपुंजवाव मांडला तर इ.स. १९०५ मध्ये आईन्स्टाईनने सापेक्षवाद सांगितला. अणुशक्तीचा शोध म्हणजे मानवाला सापडलेली एक प्रचंड शक्ती आहे.

अणुशक्ती विधायक कार्यासाठी देखील उपयोगी पडू शकते. अणुशक्तीवर पाणबुड्या चालतात, रोगनिदान होते. त्याचप्रमाणे टेलिव्हिजनचा शोध, रडार, लेसर किरणांचा व कॉम्प्युटरचा शोध ही विसाव्या शतकातील महान आश्चर्य आहेत. तर एकविसाव्या शतकात नॅनों तंत्रज्ञानाने विज्ञान विश्वात क्रांती केली आहे. या सर्वांतूनच विज्ञानसाहित्याला प्रेरणा मिळत गेली.

विज्ञान म्हणजे काय ? वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे सामाजिक प्रगती कशी होत आहे, याची माहिती करून घेतलेली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार केल्यामुळे समाजातील अंधश्रद्धा नाहीशा होतात.

नवनवीन संशोधक निर्माण होऊ लागले आहेत. या संशोधकांनी समाजाला वैज्ञानिक दृष्टी दिली. यामध्ये जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांनी अनेक शास्त्राचा पाया रचला. न्यूटनने १७ व्या शतकात गुरूत्वाकर्षणाचा महान सिद्धांत मांडला, तर रोग हे जंतुंमुळे

होतात हे लुई पाश्चरनी सांगितले. आईनस्टाईनने सापेक्षवादाचा महान सिद्धांत मांडला तर एडिसनने त्यांच्या संपूर्ण आयुष्यभर विज्ञानाची सेवा केली. त्यांनी एकूण १३०० शोध लावले.

अशारीतीने विज्ञान व तंत्रज्ञान हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत याचे चित्रण विज्ञान साहित्यातून झालेले दिसते.

विज्ञान, अवतीभवतीचे स्थूल जड जग व निसर्ग जाणून घेण्याचा मानवाचा एक पद्धतशीर आणि प्राचीन काळापासून चालत आलेला प्रयत्न आहे. त्यासाठी मानवाने निसर्गातील घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण केले व निसर्गातून आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तू कशा मिळवाव्यात याची साधने शोधली. या ज्ञानाचा उपयोग अनेक उपयुक्त कार्यासाठी त्याने केला. त्यामुळे मानवी जिज्ञासेचे क्षेत्रही व्यापक झाले तसेच मानवाचे ज्ञान समृद्ध होत गेल्याचे दिसते.

निसर्ग जाणून घेण्याचा व निसर्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेचा विज्ञानात मुख्यत्वे अंतर्भाव होतो. मानवाचे जीवन सुखी व सुरक्षित करण्याचे एक साधन ही विज्ञानकडे पाहण्याची दृष्टी सुरूवातीपासूनच विकसित होत गेली आहे. शंभर वर्षांपासूनच काय, दहा पंधरा वर्षांपूर्वी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आज साध्य झाल्या आहेत. उदा. मोबाईल, इंटरनेट, अंतरिक्षयान, कॉम्प्युटर. या सर्वांचे दर्शन हे विज्ञानकथेत होताना दिसते.

- **विज्ञान कथेची वैशिष्ट्ये :-**

अलिकडचे युग हे विज्ञानयुग आहे. विज्ञानाच्या बळावर मानवाने केलेली प्रगती ही विस्मयकारक आहे. मूलतः निसर्गाने मानवाला बुद्धीचे जे वरदान दिले आहे त्याचा वापर करून मानवाने आतापर्यंत प्रचंड प्रगती केली आहे. माणूस हाच एकमेव असा प्राणी आहे की त्याला प्रश्न पडतो. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न त्याने केला अन् त्यातून त्याला उत्तरे मिळत गेली.

- **विज्ञानातील शोध विधायक आणि विनाशकही :-**

विज्ञान ही एक शक्ती आहे. ती चांगली की वाईट, हे तिचा वापर आपण कशासाठी करतो यावर अवलंबून असते. मानवाचे कल्याण व्हावे या हेतूनेच शास्त्रज्ञांनी अत्यंत परिश्रम करून शोध लावले. पण त्याचा वापर अनेकवेळा वाईटासाठी करण्यात आला. अणुबॉम्बची निर्मिती ही विज्ञानामुळे झाली. तसेच मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले, मंगळापर्यंत त्याची मजल गेली, याचे श्रेय विज्ञानालाच जाते. आजचे युग हे तर कॉम्प्युटरचे आहे. या अशा युगात प्रत्येक मानव हा विज्ञाननिष्ठ होणे गरजेचे आहे. विज्ञानाच्या विकासाबरोबरच माणसाच्या वैज्ञानिक दृष्टीचा विकास होणे गरजेचे

आहे. अशी दृष्टी जर लाभली नाही तर मोठा अनर्थ निर्माण होतो. असा अनर्थ होऊ नये म्हणून समाजाचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. अशा प्रबोधनासाठीच विज्ञानाचे शोध हे वरदान ठरतात तर काही वेळा शापही ठरतात. उदा. अणुबॉम्ब- दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बचा वापर झाल्यामुळे 'हिरोशिमा व नागासाकी' शहरांचा संहार झाला.

विज्ञानाचा शोध लावणारा माणूस त्याचा वापर चांगल्या कामाकरिता, मानवाच्या कल्याणाकरिता करीत असेल तर तो नायक ठरतो. जर मानवाच्या वाईटासाठी करीत असेल तर तो खलनायक ठरतो.

प्रगतीपथावर असलेल्या भारताला वैश्विक स्पर्धेत आपले नाव अग्रभागी टिकवायचे असेल तर प्रत्येक नागरिक हा विज्ञाननिष्ठ बनायला हवा. 'जय जवान', 'जय किसान' याबरोबरच 'जय विज्ञान' ही घोषणा मनापासून स्वीकारली पाहिजे. परिस्थिती आता अशी आहे की, सर्व लोकांना विज्ञानाभिमुख व्हावेच लागेल.त्यासाठी प्रत्येकाने स्वत:मध्ये वैज्ञानिक जाणीव निर्माण केली पाहिजे. अशी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न बाळ फोंडके यांनी त्यांच्या कथेतून केला आहे. अशा कथा लिहून त्यांनी लोकांना विज्ञानाची गोडी लावली आहे. विज्ञाननिष्ठ माणूस म्हणजे फक्त विज्ञानाची माहिती असणारा नव्हे तर विज्ञानाची माहिती विधायक कामासाठीच खर्च व्हावी, यासाठी आग्रह धरणारा आणि इतरांनाही विज्ञाननिष्ठ होण्यासाठी आग्रह धरणारा होय.

- **विज्ञान क्षेत्रातील माहिती मिळते :-**

सर्वसामान्य माणसाला विज्ञानाचे सर्व फायदे हवे असतात पण त्याचे ज्ञान नको असते. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टी त्याला लाभत नाही. विज्ञान कथेमुळे वाचकांना विज्ञानक्षेत्रातील तंत्रज्ञान, प्रगती, सिद्धांत, प्रयोग यांची माहिती मिळते.

कॉम्प्युटर, उपग्रह, यान, उडत्या तबकड्या, सुर्यमाला, आकाशगंगा, पृथ्वीचा भ्रमण वेग, तारामंडल, याबद्दलची शास्त्रीय माहिती तर मिळतेच पण त्याचबरोबर न्यूटन, आईनस्टाइन, सारख्या महान शास्त्रज्ञांच्या सिद्धांताबद्दलही थोडेफार ज्ञान मिळते. यामुळे वाचकांच्या विज्ञानसंदर्भातील ज्ञानात भर पडते.

- **वैज्ञानिक दृष्टी लाभते :-**

मानवाने वैज्ञानिक दृष्टीचा स्वीकार केला आहे. पण वैज्ञानिक दृष्टी मिळविण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. खरे तर बदलती परिस्थिती विचारात घेता सर्वसामान्य माणसाने विज्ञानाभिमुख

होणे नितांत गरजेचे आहे. आधुनिक जीवनदृष्टी लोकांनी स्वीकारावी यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी वैज्ञानिक कथा खूपच उपयुक्त ठरतात. या कथांतून वाचकाला एक नवी दृष्टी येते. विज्ञानाचा उपयोग केव्हा अन् कितपत करावा हेही समजते.

- **अंधश्रध्देचे प्रमाण कमी होते :-**

आपला देश आज एकविसाव्या शतकातही अंधश्रध्देच्या गाळात रुतला आहे. खरे तर आपले पूर्वज एकेकाळी खूप पुढारलेले व विज्ञाननिष्ठ होते. निसर्गाबद्दल प्रश्न विचारायचे, तर्क करायचे आणि आपल्या परीने उपाययोजना करायची. अशी सुसंबद्धता, उपनिषदता, गीतेत आढळते. पण ही प्रवृत्ती पुढे लुप्त झाली आणि समाजात अंधश्रद्धेचे प्राबल्य वाढले. त्यामुळे आता पुन्हा नव्याने वैज्ञानिक दृष्टीचा स्वीकार करून अंधश्रद्धेचे प्रमाण आणि प्राबल्य कमी केले पाहिजे. उदा. आजही प्रगत अशा महाराष्ट्रात 'गणपती दूध पितो',' माहिमच्या खाडीचे पाणी गोड होते' ह्या वार्ता वाऱ्यासारख्या पसरताना दिसतात. देव, दैव, नशीब, जादूटोणा, ग्रहशांती, कुंडली, राशीचक्र अशात सारा समाज अडकला आहे. अशावेळी वैज्ञानिक माहितीचा प्रसार करून ही अंधश्रध्दा दूर करता येणे शक्य आहे.

धुमकेतू, ग्रहण, पौर्णिमा, अमावस्या, भूकंप, उल्कापात याबद्दल आपल्याकडे आजही चुकीच्या पद्धतीने विचार केला जातो. हे टाळण्यासाठी निखळ वैज्ञानिक दृष्टी स्वीकारून अंधश्रद्धेला कायमचे गाडून टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी विज्ञान कथा, कादंबऱ्याची गरज आहे.

- **विवेकवादी समाजाची निर्मिती होते :-**

विवेकवादी समाजाची निर्मिती करणे हे विज्ञानाचे महत्त्वाचे काम आहे. विवेकाचे वरदान केवळ मानवालाच लाभले आहे. पण अलिकडे त्यांची विवेकबुद्धीच नष्ट झाली आहे. अशावेळी विवेकवादाचा प्रसार होणे गरजेचे आहे. चांगले काय आणि वाईट काय ?, योग्य काय आणि अयोग्य काय ? यातील फरक जाणण्याची बुद्धी म्हणजे विवेकबुद्धी होय. वास्तव समजून न घेता चुकीच्या पद्धतीने घटनेचा अर्थ लावण्याची पद्धती अत्यंत घातक आहे. यामुळे समाज मागासलेला राहतो.

अलीकडे जयंत नारळीकर, डॉ.नरेंद्र दाभोळकर आदींनी विज्ञान संकल्पना स्पष्ट करून समाजाची विवेकबुद्धी विकसित करण्याचा मनापासून प्रयत्न केलेला दिसून येत आहे.

● **भविष्यकाळाचे चित्र रेखाटता येते :-**

आजची वास्तव परिस्थिती ही कधीकाळी अतिरंजीत अशी कथा म्हणून समजली जात होती. खरे तर वैज्ञानिक हा भविष्यकाळाचे चित्र रेखाटणारा एक कलावंतच असतो. तो ज्यावेळी एखादी गोष्ट सांगतो, एखादा सिद्धांत मांडतो त्यावेळी त्याची थट्टा करून त्याला मुर्खात काढले जाते. न्यूटन, आईनस्टाईन, राईट बंधू आदी शास्त्रज्ञांना या साऱ्या मानहानीतून जावे लागले आहे. त्यांच्या या कल्पना भाकड आहेत, अशक्यप्राय आहेत असाच सर्वांचा समज होता. पण आज त्यांनी रेखाटलेले चित्र सत्यात उतरलेले दिसते. इतकेच नव्हे तर त्याचा लाभ सर्वजण घेत आहेत. अनेक विज्ञानकथाकारांनी आपल्या विज्ञान कथेतून भविष्यकाळातील समाजाचे चित्र रेखाटले आहे आणि त्यातील बऱ्याच गोष्टी खऱ्या ठरल्या आहेत.

आणखी काही वर्षांनी निश्चितच परग्रहावरील जीवसृष्टीचा शोध लागू शकतो. आपण तिथे पोहोचू अथवा तिथली माणसे इथे पृथ्वीवर येतील. आज ना उदया मानवाला वस्तीसाठी एखादा ग्रह शोधावा लागेल. पृथ्वीवरची ऊर्जा आज ना उदया संपेल अन् त्यावेळी अंतराळात रिप्लेक्टर्स बसवून सौरऊर्जेचा वापर करावा लागेल. अशा अनेक कल्पना विज्ञानकथेत केल्या जातात. आज जरी हे अशक्य वाटत असले तरी या गोष्टी भविष्यात सत्य स्वरूपात उतरतील. त्यादृष्टीने विज्ञानाची वाटचाल सुरू आहे.

चंद्र ही एकेकाळी कविकल्पना होती. चंद्रावर माणूस जाऊ शकेल हे जर कुणी विसाव्या शतकाच्या प्रारंभी सांगितले असते तर लोकांनी विश्वास ठेवला असता ? पण १९६९ साली नील आर्मस्ट्राँगने हा पराक्रम केलाच ना ! असाच प्रकार कृष्णविवराच्या बाबतीत पुढे भविष्यात घडणार नाही कशावरून ? गर्भलिंगनिदानाचे तंत्र आज विकसित झाले आहे. विज्ञानाच्या साहाय्याने भविष्यात मानव किती झेप घेऊ शकेल याचे काल्पनिक चित्र अनेक विज्ञानकथेतून रेखाटले जाते. विज्ञानकथांचा हेतू हाच असतो. त्यामुळे एक नवी, पण सजग दृष्टी वाचकांना प्राप्त होते.

● **विज्ञान शाप की वरदान :-**

विज्ञानाच्या जोरावर मनुष्य आकाशात पक्ष्याप्रमाणे विहार करू शकला, पाण्यात माशाप्रमाणे पोहू लागला असे दिसून येते. विज्ञान हे वरदान आहे की शाप ? हा मुद्दा नेहमीच चर्चिला जाताना दिसतो.

विज्ञानामुळे मानवाचे कल्याणही झाले आहे, अन नुकसानही झाले आहे. आज या वैज्ञानिक शक्तीचा वापर अनिष्ट करण्यासाठी केलेला दिसून येतो. उदा. हायड्रोजन बॉंबमुळे दुसऱ्या महायुद्धात झालेला प्रचंड मानवी संहार हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी सामर्थ्य वाढले असले तरी मानवाने त्याचा विधायक कारणासाठी उपयोग केला पाहिजे. त्यासाठी विवेकशक्तीबरोबरच नीतिमुल्ये जोपासणे नितांत गरजेचे आहे. ही नीतिमुल्ये जोपासली नाहीत तर विज्ञान हे वरदान न ठरता शाप ठरेल. उदा. गर्भलिंग निदानामुळे या पृथ्वीवरील समतोल ढळून मानवाचे प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विज्ञानावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

जयंत नारळीकर म्हणतात, विज्ञानाचे लाभ पचवायला मानव जातीत एक परिपक्वता पाहिजे, ती नसली तर त्या शोधांनी मानवजातीचे कल्याण होण्याऐवजी अकल्याणच होईल. याशिवाय विज्ञान कथा विज्ञानाची प्रचिती देते व वाचकाला अंतर्मुख करणारी असते. विज्ञान कथेत अद्भुतरम्यता, गुढता, रहस्यमयता, रंजनपरता अशी अनेक वैशिष्ट्ये येतात.

तात्पर्य, मराठी वाङ्मयातील विज्ञान साहित्याचा विचार करता, प्राचीन मराठी वाङ्मयात विज्ञानाचा वापर क्वचितच दिसतो. मराठी वाङ्मयात विज्ञान लेखनाची परंपरा श्री. बा. रानडे यांच्या पासून सुरू झाली आणि आज अनेक साहित्यिकांनी विज्ञानाचा विविधांगी आविष्कार करून मराठी साहित्यात विज्ञान साहित्याला स्वतंत्र स्थान व प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली दिसते. त्यात श्री.बा.रानडे, भालबा केळकर, जयंत नारळीकर, बाळ फोंडके, निरंजन घाटे, लक्ष्मण लोंढे, अरूण मांडे या लेखकांचे श्रेय अधिक असल्याचे दिसते. मराठी विज्ञान साहित्याला विविधांगी धुमारे फुटत आहेत व मराठी विज्ञान साहित्य समृद्ध व संपन्न होत आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठी वाङ्मयातील कथेचा प्रवास, विज्ञान कथेचा प्रारंभ, विज्ञानकथाविषयक मासिके व नियतकालिके, मराठी विज्ञान परिषदेचे कार्य, विज्ञान आणि साहित्य परस्परसंबंध, विज्ञानकथा साहित्याच्या प्रेरणा व वैशिष्ट्ये यांचे विवेचन केलेले आहे.

● निष्कर्ष :-

१. १९६० नंतर मराठी कथेत दलित, ग्रामीण, प्रादेशिक, विज्ञान असे कथाप्रवाह स्वतंत्रपणे अस्तित्वात आल्याचे दिसते. त्यामध्ये विज्ञानकथा हा महत्त्वाचा कथाप्रवाह दिसून येतो.

२. विज्ञान कथेचा प्रारंभ पाश्चात्य साहित्यात प्रथम झाल्याचे दिसते. इंग्रजी विज्ञानकथेचा विकास आणि विस्तार मुख्यत्वे करून एडगर ॲलन पो, ज्यूल्स व्हर्न, आणि एच.जी.वेल्स या तीन लेखकांमुळे झाल्याचे दिसते.

३. सुरूवातीला मराठी विज्ञानकथा ही बहुतांशी पाश्चात्य विज्ञानकथांच्या अनुवादित अशा स्वरूपातील आहे.

४. भारतातील अनेक भाषांमध्ये विज्ञानकथा लिहिल्या गेल्याचे दिसते परंतु मराठी इतका जोमदार प्रवाह कोणत्याच भाषेत दिसून येत नाही. तसेच गुणवत्तेच्या दृष्टीने विचार करता मराठी विज्ञानकथा अधिक समृद्ध आहे.

५. विज्ञान कथेच्या विकासात नियतकालिकांचे व मासिकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

६. मराठी विज्ञानपरिषदेने विज्ञानकथेच्या विकासासाठी, प्रचारा व प्रसारासाठी मोलाचे कार्य केलेले दिसून येते.

७. विज्ञान व साहित्याचा परस्पर संबंध आहे. त्यामध्ये मानवी जीवनाला व्यापून राहणाऱ्या विज्ञानाचे, वैज्ञानिक शोधांचे, प्रगतीचे चित्रण साहित्यात येते.

८. समाजातील अंधश्रध्दा कमी करून समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, या हेतूने विज्ञान साहित्य लिहिले जाते. तसेच आनंद, जिज्ञासा, उत्सुकता, रंजन, गूढ, काल्पनिकता यामुळेही विज्ञानसाहित्य लिहिले जाते.

९. विज्ञानकथेत अद्‌भुतरम्यता, गूढता, रहस्यमयता, रंजनपरता अशी अनेक वैशिष्ट्ये आढळतात.

यापुढील प्रकरणात विज्ञानकथेचे स्वरूप व संकल्पना याविषयी विविचेन केले आहे.

## • संदर्भ ग्रंथ सूची •


१) डॉ.वसंत बिरादार :- 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' (१८१८ ते १९९९) प्रकाशन-कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद आवृत्ती- प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९९९, पृ.क्र. १६१

२) डॉ.सु.प्र.कुलकर्णी :- ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका ' प्रकाशन -महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, आवृत्ती ऑक्टोबर २००६ ते डिसेंबर २००६ (त्रैमासिक) पृ.क्र. ७

३) मराठी विश्वकोश :- ' खंड-१६' ' वादयवृंद ते विज्ञान शिक्षण ' प्रकाशन- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पृष्ठ क्र. - ९९१

४) उनि :- पृ.क्र. ८

५) डॉ.व.दि.कुलकर्णी/ निरंजन घाटे :- 'विज्ञान साहित्य आणि संकल्पना' प्रकाशन - निहारा प्रकाशन, आवृत्ती - प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९९०, पृ.क्र.१२०